# १ जुलै, २०११

# ते

# ३० जुलै, २०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४४२/२०११.**

श्री. मच्छींद्र जंगलुजी आवळे,
४२, कानफाडे नगर,
नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. पी. पासेबंद,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (पश्चिम)
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

श्री. एस. एम. पोहेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता, (मुल्यांकन)
नागपूर सुधार प्रन्यास, सदर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ९.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा इमारत अभियंता (पश्चिम), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन अभिन्यास क्रमांक ५७२/९७, मौजा अजनी, खसरा क्रमांक ७२/२, मिलींद सहकारी गृह निर्माण संस्था बाबत एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २३.१२.२०१०

... २

च्या पत्राने असे कळविले की, मुद्या क्रमांक १ ची माहिती ही मुल्यांकन विभाग, नागपुर सुधार प्रन्यास यांचेशी संबंधित आहे. तसेच मुद्या क्रमांक ३ बाबत आपणास कोणते दस्ताऐवज हवेत याबाबत खुलासा होत नाही म्हणून आपण कार्यालयात येऊन अभिलेखाची पडताळणी करुन घ्यावी म्हणजे दस्ताऐवज देता येतील. तसेच मुद्या क्रमांक २ व ४ बाबत ची माहिती प्राप्त करण्यासाठी रुपये १६/- शुल्काची रक्कम भरणा करावी म्हणजे ती माहिती देता येईल व मुद्या क्रमांक ५, ६ व ७ बाबत विभागीय अधिकारी पश्चिम नार्थ अंबाझरी रोड, नागपूर सुधार प्रन्यास यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडून प्राप्त होईल असे त्यांनी कळविले. तथापी त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता (पश्चिम) यांचेकडे दिनांक ८.२.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व अपीलकर्त्याचा मुद्या क्रमांक ५, ६ व ७ ची माहिती १० दिवसांत देण्याबाबत आदेश दिले. तसेच मुद्या क्रमांक २ व ४ ची माहिती इमारत अभियंता यांनी अपीलकर्त्यास १० दिवसात उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले व मुद्या क्रमांक १ बाबत मुल्यांकन विभागामधून १० दिवसाचे आंत माहिती देण्याचे आदेश दिले. तथापी त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ९.१२.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १०.१२.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही नागपूर सुधार प्रन्यासच्या वेगवेगळया ३ विभागाशी संबंधित होती. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक २३.१२.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत वस्तुस्थिती दर्शक उत्तर पाठविले. त्यानंतर प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.२.२०११ रोजी पारित केला व त्यामध्ये मुद्या क्रमांक ५, ६ व ७ ची माहिती जनमाहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी (पश्चिम) यांनी १० दिवसांत अपीलकर्त्यास माहिती देण्याचे आदेश दिले. तसेच मुद्या क्रमांक २ व ४ ची माहिती इमारत अभियंता (पश्चिम) नागपूर यांना अपीलकर्त्यास १० दिवसांत माहिती देण्याचे आदेश दिले व मुद्या क्रमांक १ ची माहिती मुल्यांकन विभागातून प्राप्त करुन घ्यावयाचे आदेश दिले.

४. प्रथम अपीलाच्या निर्णयास अनुसरुन अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक २ व ४ ची माहिती आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. तसेच मुद्या क्रमांक ५, ६ व ७ ची माहिती अपीलकर्त्यास दिनांक १०.३.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली व मुद्या क्रमांक १ ची माहिती अपीलकर्त्यास पोस्टाने दिनांक १०.१.२०११ रोजी पाठविण्यात आली. तथापी सदरची माहिती पोस्टाने अपीलकर्त्यास मिळाली नाही म्हणून आयोगासमोर मुद्या क्रमांक १ ची माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली. ती माहिती अपीलकर्त्याने स्विकृत केली. मात्र मुद्या क्रमांक ३ यामध्ये अपीलकर्त्याने समितीचा अहवाल सन १९९० ते १९९२ याबाबत नेमकी त्यांना कोणती माहिती पाहिजे आहे याचा स्पष्ट बोध होत नाही म्हणून अपीलकर्त्यास दिनांक २३.१२.२०१० च्या पत्राने निरिक्षणासाठी त्यांचे कार्यालयात बोलाविले होते. तथापी अपीलकर्त्याने त्या अभिलेखाचे निरिक्षण करण्यास कार्यालयात उपस्थित झालेले नाही. म्हणून मुद्या क्रमांक ३ च्या माहितीबाबत अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून अभिलेखाचे अवलोकन करुन घेऊन त्यांना नेमकी जी माहिती पाहिजे ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता जनमाहिती अधिकारी तथा इमारत अभियंता (पश्चिम), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहिती अर्जातील मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भातील अभिलेखाचे निरिक्षण करुन घ्यावे व त्यांना पाहिजे असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५९४- ५९६/१.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४४७/२०११.**

श्री. नानाजी जैदास रामटेके,
रा. जानवा, पो. इटखेडा,
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर.

श्री. डॉ. साळवे,
जनमाहिती अधिकारी तथा
वैद्यकीय अधिक्षक,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. चौधरी, प्रशासकीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २४.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सौ. रत्नमाला नानाजी रामटेके, रा. जानवा ही मानसिक विकाराने आजारी असल्याचे प्रमाणपत्र मिळणेबाबत माहिती

... २

मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १२.७.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहिती ही अभिलेखागार विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडून मागविण्यात आलेली आहे व त्यांचेकडून माहिती प्राप्त होताच आपणास माहिती उपलब्ध करुन देता येईल असे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविले होते. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा त्यांना दिनांक २४.८.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण माहिती अधिकारांतर्गत सौ. रत्नमाला नानाजी रामटेके यांच्या आजाराचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत माहिती मागविलेली होती ती संबंधित विभागाकडून या कार्यालयास प्राप्त झालेली असून आपणास ती देण्यात येत आहे. सौ. रत्नमाला नानाजी रामटेके यांनी दिनांक ४.५.२०१० ते दिनांक १२.६.२०१० या कालावधीनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे उपचार केलेले असल्याचे जोडपत्र अ नुसार लक्षात येत आहे. परंतु आपण मानसिक आजाराचे प्रमाणपत्र मागणी केलेली आहे व मानसिक आजाराचे प्रमाणपत्र हे आपल्याला स्वतःहा संबंधित विभागातील डॉक्टरांना प्रत्यक्ष भेटून घेता येईल. कारण अभिलेखागार विभागात असे प्रमाणपत्र देण्याची सोय उपलब्ध नसल्यामुळे मानसिक रोगाचे प्रमाणपत्र देता येणे शक्य नाही. अशी माहिती त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. तथापी त्याना मानसिक आजाराचे प्रमाणपत्र मिळालेले नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक १२.७.२०१० च्या पत्राने व दिनांक २४.८.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तथापी अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांना त्यांची पत्नीचे मानसिक आजाराचे प्रमाणपत्र त्याना पाहिजे आहे. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असा खुलासा केला की, वैद्यकीय प्रमाणपत्र देण्याचे संदर्भात एक निश्चित प्रक्रिया ठरलेली आहे. त्यानुसार ज्या व्यक्तीस वैद्यकीय प्रमाणपत्र पाहिजे आहे त्या व्यक्तीने संबंधित डॉक्टरकडे स्वतःहा उपस्थित राहून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे घेतलेल्या औषधांचा दस्तऐवज सादर केला तर त्यांना योग्य ते वैद्यकीय प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल असे आयोगापुढे नमुद केले.

... ३

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १२.७.२०१० व दिनांक २४.८.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तथापी अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांची पत्नी सौ. रत्नमाला नानाजी रामटेके याना मानसिक आजाराचे प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या पत्नीला मानसिक आजाराचे प्रमाणपत्र देण्याचे संदर्भात योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी त्यांची पत्नी सौ. रत्नमाला नानाजी रामटेके यांना जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित केल्यानंतर आणि घेतलेल्या ओषधांचा दस्तऐवज सादर केल्यावर जनमाहिती अधिकारी यांनी मानसिक आजाराचे प्रमाणपत्र देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. त्यासाठी अपीलकर्त्याने त्यांच्या पत्नीला जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर करुन घेतलेल्या औषधांचा दस्ताऐवज सादर करावा.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५९७- ५९९/१.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४४८/२०११.**

श्री. नानाजी जैदास रामटेके,
रा. जानवा, पो. इटखेडा,
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. ओ. ठक्कर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकाष्ठ निष्कासन अधिकारी,
वन विभाग, नवेगांव बांध,
जि. गोंदिया.

श्री. एस. आर. थिपे,
जनमाहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्राधिकारी,
वनक्षेत्र, ता. अर्जुनी/मोर,
जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.४.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, अर्जुनी/मोर, जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांच्या अतिक्रमण शेत जमीनीत मौजा जानवा, त.सा.क्र. १९ व गट नं. ९३ जुना, गट नं. ८ नवीन मध्ये

... २

वनविभागानी रोजगार हमी योजने अंतर्गत वर्ष १९९१ ला क्षेत्र २५ हे.आर. मध्ये भरीव रोपवन घेण्यात आले. ती जमीन कोणत्या विभागाची आहे व हल्ली ताबा कोणत्या विभागाचा आहे याची माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ७.५.२००९ च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. तथापी त्यांचे अपेक्षेप्रमाणे त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.४.२००९ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती दिनांक ७.५.२००९ च्या पत्राने त्यांना उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये असे कळविले की, त.सा.क्र. १९, मौजा जानवा येथे गट नं. ४, ८ व १३७ मध्ये रोजगार हमी योजने अंतर्गत भरीव रोप वन १९९१ क्षेत्र २५ हेक्टर मध्ये रोपवन घेण्यात आले आहे व सदर गट नं. ४, ८ व १३७ वर हल्ली ताबा वनविभागाचा आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र ही जमीन कोणाची आहे त्याची माहिती त्यांना मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या जमीनीवर ताबा हा वन विभागाचा असल्यामुळे सदरची जमीन ही वनविभागाची आहे व सदरची जमीन वनविभागाची असल्यामुळे त्याबाबत ७/१२ चा उतारा त्यांनी आयोगापुढे दाखविला. सदरचा ७/१२ चा उताऱ्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. ती प्रत अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली.

४. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ७.५.२००९ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तसेच आयोगासमोर या जमीनीचा ७/१२ चा उतारा देखील उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६००-६०२/१.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४४९/२०११.

श्री. सुरेश जयकृष्ण पाटील,
बी-१०२, क्लासिक पवन अपार्टमेंट,
प्रियदर्शनी टि पॉईंट जवळ,
हिंगणा रोड, टाकळी सिम,
नागपूर - ४४० ०१६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १,
नागपूर.

श्री. एस. एम. कांडलकर,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. पाडवार, विधी सल्लागार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ७.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, नागपूर यांचेकडे

... २

माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री. विकास बळवंतराव बढे यांना जात वैधता प्रमाणपत्र दिले आहे त्या प्रकरणी सोबत असलेल्या कागदपत्राच्या प्रती त्यांनी मागितल्या होत्या. तसेच जात पडताळणी समिती, नागपूर यांनी वर्धा जिल्हयासाठी दिनांक २६.५.१९९७ च्या सुमारास जारी केलेल्या कोणत्याही ३ जाती वैधता प्रमाणपत्राच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. तथापी त्यांना दिनांक २३.१२.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी असे कळविले की, आपण मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याने त्यांचे पुर्व परवानगी शिवाय उपलब्ध करुन देता येणार नाही. श्री. बढे यांची संमती प्राप्त होताच माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १५.१.२०११ रोजी विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील खारीज केल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दा ाल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ७.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता व त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २३.१२.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागणी केलेली माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याने त्यांच्या पुर्व परवानगी शिवाय माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. श्री. बढे यांची संमती प्राप्त होताच माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलकर्त्यास कळविले होते. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व अपीलकर्त्याचे प्रथम अपील खारीज करण्यात आल्याचे विधी सल्लागार यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी व विधी सल्लागार यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, यापुर्वी अपीलकर्त्याने आयोगाकडे याच विषयाबाबत अपील क्रमांक १७५७/२०१० दाखल केलेले होते. त्या अपीलाची सुनावणी दिनांक १९.३.२०११ रोजी घेण्यात आली होती व दिनांक १९.३.२०११ रोजी असा निर्णय दिला होता की अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात संपूर्ण रेकॉर्डचे निरिक्षण करुन देण्याचे आदेश होते. त्याप्रमाणे अपीलकर्त्याने त्यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात संपूर्ण रेकॉर्डचे निरिक्षण करुन घेतले.

तथापी सन १९९७ पुर्वीच्या रेकॉर्डला उधळी लागल्यामुळे अपीलकर्त्यास कोणतीही माहिती रेकॉर्ड निरिक्षणाअंती मिळू शकली नाही व सदरच्या रेकॉर्डचे निरिक्षण अपीलकर्त्याने केल्याचे आयोगापुढे मान्य केले. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात यापुर्वी देखील दिनांक ८.३.२०११ च्या पत्राने आपण मागितलेली माहिती ही १३-१४ वर्षापुर्वीची जुनी असल्यामुळे व वाळवीत उधळीने नष्ट केली असल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविल्याचे आयोगापुढे सांगितले व अपीलकर्ता हे पुन्हा पुन्हा तीच माहिती मागत असतात असे सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे संदर्भात त्यांनी रेकॉर्डचे निरिक्षण केलेले दिसून येते. तसेच अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही १३-१४ वर्षापुर्वीची असल्यामुळे व वाळवीने उधळीने नष्ट झाल्यामुळे ती माहिती उपलब्ध होऊ शकत नाही असे दिसून येते. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक १, २ च्या संदर्भात माहिती उपलब्ध नाही असे पुन्हा स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येईल.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ७.१२.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती वर नमुद केलेल्या कारणास्तव उपलब्ध होऊ शकत नाही असे स्पष्टपणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६०३-६०५/२.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४५२/२०११.**

श्री. नितीन वासुदेव गोथे,
प्रभात अपार्टमेंटस, प्लॉट नं. यु-९,
लक्ष्मीनगर, नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. सुहास चव्हाण,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
का. आरोग्य - ३,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ६.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन मुबई, ठाणे, पुणे आणि नागपूर या जिल्हयातील वैद्यकीय रुग्णालयांची यादी (ग्रामीण रुग्णालये वगळून) मागितलेली होती.

... २

तसेच वरील नमुद केलेल्या वैद्यकीय रुग्णालयाच्या परिसरात खाजगी औषधी दुकानांना औषधी विकण्यास हया मंत्रालयाने परवानगी दिली असल्यास त्यासंबंधी सर्व माहिती कागदपत्रे त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यांना प्रथम अपीलाचा निर्णय अद्याप प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ६.१२.२०१० चा अर्ज दिनांक १०.१.२०११ रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे त्या कार्यालयाकडे त्यांनी दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज हस्तांतरण केला व त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. मात्र संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडून अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दिनांक ८.२.२०११ रोजी दाखल केले. उपसचिवांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपीलाचाच्या सुनावणीसाठी नोटीस काढण्यात आली. सदरची सुनावणी दिनांक २४.२.२०११ रोजी ठेवण्यात आली होती. मात्र सदरच्या सुनावणीची नोटीस अपीलकर्त्यास २४.२.२०११ रोजी प्राप्त झाल्यामुळे अपीलकर्ता त्या सुनावणीस उपस्थित राहू शकले नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. तथापी जनमाहिती यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे हस्तांतरण केला असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांची कार्यवाही योग्य ठरवून प्रथम अपील फेटाळलेले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांनी आयोगापुढे नमुद केले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकू न घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा दिनांक ६.१२.२०१० चा अर्ज संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने हस्तांतरण केलेला आहे. तथापी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत

माहिती उपलब्ध करुन देण्याची कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे व सदरच्या विलंबास जनमाहिती अधिकारी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये २००००/- शास्तीची कार्यवाही कां लादण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगापुढे १५ दिवसांचे आंत सादर करणे आवश्यक आहे. तसेच अद्यापपर्यंत अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे आता सदरची माहिती जनमाहिती अधिकारी सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई कडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य १५ दिवसांत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सा.आ.-३, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहितीच्या अर्जातील माहिती संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी आरोग्य-३, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे हस्तांतरण केलेला आहे. तथापी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विहीत मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसत नाही. म्हणून अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध होण्यास संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे कार्यालयातील जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये २००००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. अन्यथा शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल.

... ४

३) या निर्णयाची एक प्रत जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सा. आ. - ३, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी

४) तसेच या निर्णयाची एक प्रत **सचिव, आरोग्य सेवा, मंत्रालय, मुंबई** यांचेकडे योग्य तया कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

५) तसेच या निर्णयाची एक प्रत **संचालक, आरोग्य सेवा, मुंबई** यांचे कार्यालयाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४५३/२०११.**

श्री. चंद्रहास सदाशिव राऊत,
१८७, दत्तनिवास अपार्टमेंटस,
दत्तात्रयनगर, नागपूर - ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. एन. नंदनवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.

श्री. आय. एच. कुमरे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक (प्रशासकीय)
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २३.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २९.११.२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्या अर्जान्वये नागपूर येथे दिनांक १०.११.२०१० ते १४.११.२०१० पर्यंत इंडियन रोड कॉंग्रेसच्या अधिवेशन झाले होते या अधिवेशनाचे

... २

संदर्भामध्ये एकूण ७ मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक २४.१२.२०१० च्या पत्राने एकूण ७ मुद्यांची माहिती त्यांचे कार्यालयात जी उपलब्ध होती ती उपलब्ध करुन देण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, इंडियन रोड कॉग्रेस ही संस्था स्वायत्त संस्था असून भारतीय रस्ते महासभेच्या विनंतीवरुन स्थानिक स्तरावर वार्षिक अधिवेशन पार पाडण्याकरिता तात्पुरत्या स्थानिक समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. त्यामुळे भारतीय रस्ते महासभेच्या स्थानिक समित्यांकडून जी माहिती प्राप्त झाली तीच माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. तथापी त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहाय्यक अधीक्षक अभियंता यांचेकडे दिनांक ४.१.२०११ रोजी दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी नंतर प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.२.२०११ रोजी देण्यात आला व त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्रमांक २, ४, ५, ६ व ७ बाबत आथिक व्यवहारांची प्रक्रिया पूर्ण होऊन ते लेखे अंकेक्षकांमार्फत तपासून त्यास मा. धर्मदाय आयुक्त यांचेकडून मान्यता प्राप्त झाल्यावरच विस्तृत माहिती उपलब्ध होऊ शकेल असे नमुद करुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २४.१२.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिल्यामुळे प्रथम अपील खारीज केले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक २३.११.२०१० चा माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २४.१२.२०१० च्या पत्राने त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. तथापी प्रथम अपीलाचे निर्णयात नमुद केल्याप्रमाणे मुद्या क्रमांक २, ४, ५, ६ व ७ बाबत आर्थिक व्यवहार प्रक्रिया पुर्ण होऊन ते लेखे अंकेक्षकामार्फत तपासून त्यास धर्मदाय आयुक्त यांचेकडून मान्यता प्राप्त झाल्यावरच विस्तृत माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद केल्याप्रमाणे मुद्या क्रमांक २, ४, ५, ६ व ७ ची माहिती आर्थिक व्यवहार प्रक्रिया पुर्ण होऊन ते लेखे अंकेक्षकामार्फत तपासून व त्यास धर्मदाय आयुक्त यांचेकडून मंजूरी प्राप्त झाल्यावर सदरची माहिती शुल्क आकारुन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४५९/२०११.**

श्री. आर. झेड. खोंड,
मु.पो.ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
निबंधक,
यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,
यशदा, बाणेर रोड, पुणे - ४११ ००७.

श्री. योगेश भोसले,
जनमाहिती अधिकारी तथा
उपनिबंधक,
यशवतंराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,
यशदा, प्रशासकीय भवन, तिसरा मजला, राजभवन आवार,
बाणेर रोड, पुणे - ४११ ००७. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. रंजीत यादव, लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन जिल्हा प्रशिक्षण समन्वयक/ प्रकल्प अधिकारी पदाकरिता दिनांक १२.११.२०१०

... २

ला घेण्यात आलेल्या मुलाखती व केलेल्या निवड संबंधाने एकूण १० मुद्यांवर कागदपत्राच्या प्रती मागितलेल्या होत्या. तथापी त्यांना त्यांचे अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २८.१.२०११ रोजी निबंधक, यशदा, पुणे यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी होऊन प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.३.२०११ रोजी देण्यात आला व प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्यास संबंधित विषयाबाबतची नस्ती तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी व तपासणीनंतर विहित शुल्क आकारुन सदर नस्तीमधील मागणी केलेली कागदपत्रे अपीलार्थी यांना पुरविण्यात यावीत असा आदेश दिलेला आहे. तथापी अपीलकर्ता कागदपत्राचे तपासणीसाठी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये उपस्थित झाले नाही. मात्र त्यानंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २०.१२.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक ४.१.२०११ च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत पत्र दिले. त्यानंतर अपीलकर्त्याने मनीऑर्डरद्वारे माहितीचे शुल्क दिनांक २०.१.२०११ रोजी पाठविले व त्यांनंतर दिनांक २१.१.२०११ रोजी अपीलकर्त्यास १० मुद्यांची मुद्येनिहाय माहिती पाठविण्यात आली.

४. तथापी त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दिनांक २८.१.२०११ रोजी निबंधक, यशदा, पुणे यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.३.२०११ रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्त्यास संबंधित नस्ती तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे आदेश होते. मात्र अपीलकर्ता संबंधित नस्तीचे तपासणीसाठी कार्यालयात आले नाही. तथापी अपीलकर्त्यास दिनांक २१.१.२०११ च्या पत्राद्वारे १० मुद्यांची सविस्तर माहिती पुरविण्यात आली असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरची माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र मुद्या क्रमांक ३, ६, ७, ८ व ९ या मुद्यांची माहिती त्यांना त्यांचे अपेक्षेप्रमाणे मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २१.१.२०११ रोजी मुद्ये निहाय पाठविलेल्या माहितीचे अवलोकन आयोगापुढे करण्यात आले. त्यामध्ये असे दिसून येते की, अपीलकर्त्याने त्यांच्या माहितीच्या अर्जात जी माहिती मागितलेली आहे ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुरविल्याचे दिसून येते. म्हणून याबाबत आयोगाची खात्री झाली.

... ३

५. म्हणून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६१३-६१५/४.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४५८/२०११.**

श्रीमती वंदना जनार्दन डोंगरे,
डॉ. कॉलनी, अजनी रेल्वे स्टेशन समोर,
क्वॉर्टर नं. ए/२-२, नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

डॉ. शिवाजी साळवे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वैद्यकीय अधिक्षक,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
मेडीकल, नागपूर.

श्री. अनिल चौधरी,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
मेडीकल, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक १०.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन व भत्ते यातील फरक भविष्य निर्वाह निधीत

... २

१९९९ पासून २०१० पर्यंत जमा न झाल्याने त्यावर जी.पी.एफ.चे व्याज मिळणार कां अशी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जी. पी. एफ. रक्कमेवर व्याज मिळेल किंवा नाही याची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अधिष्ठाता यांचेकडे दिनांक २०.११.२०१० रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना जी.पी.एफ. रक्कमेवर व्याज मिळाले किंवा नाही याची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक १.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १४.९.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने पाचवा वेतन आयोगाप्रमाणे वेतन व भत्ते यातील फरक भविष्य निर्वाह निधि खात्यात जमा करणेबाबत व व्याज मिळाले काय याबाबत माहिती मागितलेली होती. त्यावेळी अपीलकर्ती हया सावनेर येथे कार्यरत होत्या. म्हणून अपीलकर्तीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात प्रपाठक, रोगप्रतिबंधक व सामाजिक औषध वैद्यकशास्त्र प्रमुख आरोग्य पथक, सावनेर यांचेकडे अपीलकर्तीच्या पाचवा वेतन आयोगाचे वेतन व भत्त्याचे फरकाबाबतची माहिती त्यांचेकडून मागविली व त्याची प्रत अपीलकर्तीस देऊन त्यामध्ये असे नमुद केले की, सावनेर यांचे कार्यालयाकडून सदरची माहिती प्राप्त झाल्यावर देयक कोषागारात पाठविण्यात येईल अशी माहिती अपीलकर्तीस जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. त्यानंतर सावनेर कार्यालयाकडून अपीलकर्तीच्या वेतन व भत्त्याचा फरक तक्ता प्राप्त झाला. त्यानंतर सदरच्या थकबाकीच्या फरकाची रक्कम अपीलकर्तीच्या जी.पी.एफ. खात्यामध्ये जमा करण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. सदरच्या थकबाकीची माहिती त्यांना प्राप्त झाल्याची त्यांनी मान्य केले. मात्र सदरच्या जी.पी.एफ. खात्यावरील रक्कमेवर व्याज मिळाले किंवा कसे अशी माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले. तथापी जी.पी.एफ.च्या रक्कमेवर महालेखाकार, नागपूर द्वितीय यांचे कार्यालयाकडून व्याज आकारणी होत असते. त्याबाबतची माहिती अपीलकर्तीस महालेखाकर, नागपूर कार्यालयाकडून मिळू शकेल असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून अपीलकर्तीस पाचवा वेतन आयोगानुसार वेतन व भत्त्याची थकबाकी रक्कम रुपये १०,१३६/- त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जानेवारी २०११ च्या वेतन बिलात जमा केलेली आहे अशी माहिती अपीलकर्तीस जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकतीचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस त्यांचा पाचवा वेतन आयोगानुसार वेतन व भत्त्यांची थकबाकीची रक्कम रुपये १०,१३६/- ही जोनवारी २०११ च्या वेतन बिलामध्ये काढून जमा करण्यात आलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे अपीलकर्तीस विनामुल्य कळवावे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६१६-६१८/४.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४५६/२०११.**

श्री. शामदेव काशिरामजी तितरमारे,
प्लॉट नं. २७०, चंदननगर,
पो. हनुमाननगर, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रमांक २, नागपूर.

श्री. अनंत थोरात,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
सदर विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. कोकोटे, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन अपीलकर्त्याने दिनांक २०.१.२०११ ला पोलीस स्टेशन, सदर येथे नानक अविनाश घोंगडे व इतर यांचे विरुद एफ.आय.आर. दाखल करण्यासाठी तक्रार दिली होती. त्याबाबत एफ.आय.आर.ची प्रत, चौकशी अहवाल तसेच चौकशी अधिकाऱ्यांचे नांव व मोबाईल

... २

नंबर इत्यादी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे कडून माहिती प्राप्त झाली. मात्र त्यामध्ये एफ.आय.आर. ची प्रत नाही व चौकशी अहवाल प्राप्त झाला मात्र त्यासोबत जोडलेले सहपत्र त्यांना मिळालेले नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्रमांक २, नागपूर शहर यांचेकडे दिनांक १५.२.२०११ रोजी दाखल केले. तथापी त्यानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २१.१.२०११ चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही पोलीस स्टेशन, सदर यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडे दिनांक २१.१.२०११ चे पत्राने त्यांचेकडून माहिती मागविली त्यानंतर पोलीस स्टेशन, सदर कडून दिनांक १०.२.२०११ रोजी माहिती प्राप्त झाली व अपीलकर्त्यास दिनांक १४.२.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र एफ.आय.आर.ची प्रत त्यांना मिळाली नाही व चौकशी अहवाल सोबतचे सहपत्र त्यांना मिळाले नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, प्रस्तुत प्रकरणात चौकशी केलेली असून त्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. त्या चौकशी अहवालावरुन या प्रकरणात एफ.आय.आर. करता येत नाही. तसेच अपीलकर्त्यास चौकशी अहवालासोबत जी सहपत्रे आहेत ती अपीलकर्त्याने शुल्क भरल्यास उपलब्ध करुन देता येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी एफ.आय.आर. दाखल करता येत नाही असे अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. तसेच अपीलकर्त्यास दिलेल्या चौकशी अहवालासोबत जी सहपत्रे आहेत त्या सहपत्राच्या प्रती देखील अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत प्रकरणात केलेल्या चौकशी अहवालावरुन एफ.आय.आर. दाखल करता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळवावे व चौकशी अहवालासोबत जोडलेली इतर सहपत्रे अपीलकर्त्यास हा आदेश मिळाल्यापासून १० दिवसांत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६१९-६२१/४.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४५७/२०११.**

श्री. शरद दिनकरराव पाचखेडे,
श्री. कृष्णराव अवताडे,
पोलीस मुख्यालयासमोर,
पटेलनगर, चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती सु. वि. कोळेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. शशांक कर्वे,
जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांचेकडे वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, चंद्रपूर यांनी उच्चतम

... २

न्यायायल, दिल्ली येथे दाखल केलेली केस क्रमांक २४५३९ व २४५४० बाबत एकूण २ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ४.७.२०११ रोजी राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांचेकडे लेखी निवेदन सादर करुन अपीलीय अधिकारी तथा उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांचेकडून दिनांक २.६.२०११ चे पत्रानुसार मला दिनांक १८.६.२०११ ला माहिती प्राप्त झालेली आहे. करिता मी अपील परत घेत आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६२२-६२३/४.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४६६/२०११.

श्री. युसुफ अली सईद याकुब अली,
भाई तालाब वार्ड, ता. पवनी,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, पवनी, जि. भंडारा.

श्री. अरविंद तुळशीराम चिलबुले,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी,
प्राथमिक शिक्षण विभाग,
नगर परिषद, पवनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ५.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २६.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, नगर परिषद, पवनी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन अपीलकर्त्याच्या दिनांक १५.३.१९७२ व दिनांक १५.९.१९७५ च्या शासन निर्णयाच्या प्रमाणे त्यांनी दिनांक २९.११.१९७५ ला वेतननिश्चितीबाबत विकल्प व अर्ज दिला होता. परंतु

... २

त्याप्रमाणे वेतननिश्चिती झाली नाही म्हणून त्याबाबत नगरपरिषदेचे ठरावाची प्रत व मुख्याधिकारी यांचे अभिप्रायाची प्रत त्यांनी मागितलेली होती. तसेच या अर्जातील (ब) मुद्यांमध्ये त्यांनी दिनांक १.१.१९८४ पासून त्यांना पदवीधर प्राथमिक शिक्षकांची वेतनश्रेणी देण्यात आली त्याबाबत शासन निर्णयाची प्रत व मुख्याधिकारी यांच्या अभिप्रायाची प्रत त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने त्यांच्या अर्जाच्या प्रती व विकल्पाची प्रत त्यांना प्राप्त झाली. मात्र तत्कालीन मुख्याधिकारी यांचे अभिप्रायाची प्रत किंवा नगरपरिषद ठरावाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दिनांक ३०.१२.२०१० रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २६.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांचे कार्यालयाकडे अपीलकर्त्याने अपीलकर्त्याच्या वेतन निश्चिती बाबतचा विकल्पाचा फॉर्म व त्याबाबतचा अर्ज इत्यादी प्रती त्यांना उपलब्ध करुन दिल्या व तत्कालीन मुख्याधिकारी यांच्या अभिप्रायाची प्रत उपलब्ध नाही असे त्यांना दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणी आयोगासमोर मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांनी विकल्प फॉर्मची व त्यांच्या अर्जाची मागणी केली नव्हती. त्यांनी नगरपरिषद ठरावाची व मुख्याधिकारी यांच्या अभिप्रायाची प्रत हया प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असा खुलासा केला की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे ३५ वर्षापुर्वीची आहे. त्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेल्या वेतन निश्चितीबाबत मागितलेल्या ठरावाची प्रत तसेच मुख्याधिकारी यांचे अभिप्रायाची प्रत यांचा शोध घेऊनही त्यांचेकडे सदरची माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपीलकर्त्यास दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलबध नसल्याचे दिसून येते. तथापी अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या त्या संदर्भातील दस्तऐवजाचे निरिक्षण करुन घेण्यास त्यांची हरकत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उपस्थित राहून जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेले दस्तऐवजाचे निरिक्षण करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दस्तऐवजांचे निरिक्षण करण्याबाबतची तारीख व वेळ लेखी कळवावी व त्याप्रमाणे अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून संबंधित दस्तऐवजांचे निरिक्षण करुन घ्यावे व निरिक्षणानंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीच्या प्रती जनमाहिती अधिकारी यांनी झेरॉक्स स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६२४-६२६/५.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४७१/२०११.**

श्री. पुरुषोत्तम लक्ष्मण आंबुरकर,
रा. हनुमान वार्ड, ता. वरोरा,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुमेध अलोणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, वरोरा, जि. चंद्रपूर.

श्री. सुभाष बोस,
जनमाहिती अधिकारी तथा
विभाग प्रमुख (कर),
नगर परिषद, वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ५.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ४.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक ७.१२.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जात श्री. धोंडु

... २

तानू आंबोरकर यांना सन २००२ ते २००७ या कालावधीत काढण्यात आलेल्या जप्तीच्या नोटीसाची साक्षांकित प्रत व त्यांच्या नावाने संडास योजनेचा लाभ देण्यात आलेल्या मंजूर यादीची साक्षांकित प्रत त्यांनी मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक २५.१.२०११ रोजी माहितीचे शुल्क रुपये ४६/- भरण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क दिनांक १.२.२०११ रोजी भरणा केला व दिनांक २.२.२०११ रोजी अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. दिनांक २.२.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी अशी माहिती उपलब्ध करुन दिली की, श्री. आंबोरकर यांचे नावाने संडास योजनेचा लाभ देण्यात आलेल्या यादीची छायांकित प्रती त्यांना उपलब्ध करुन दिली तसेच अपीलकर्त्याने सन २००२ ते २००७ या कालावधीत कर वसुलीच्या संबंधात जप्तीच्या नोटीसा श्री. आंबोरकर यांना पाठविण्यात आल्या त्यांची प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याच्या या मुद्यांची माहिती ही सुमारे १० वर्षाची असल्यामुळे त्या दस्तऐवजांचा शोध घेण्यात येत आहे असे अपीलकर्त्यास दिनांक २.९.२०११ च्या पत्राने कळविले होते.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने मुख्याधिकारी, नगर परिषद, वरोरा यांचेकडे दिनांक ११.२.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ८.४.२०११ रोजी घेण्यात आली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. मात्र जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ११.४.२०११ रोजी मुख्याधिकारी यांनी दिला व त्या निर्णयात असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच श्री. धोंडू तानू आंबोरकर यांचे मालमत्तेसंबंधी जप्ती कार्यवाहीबाबतची कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही. असे नमुद करुन प्रथम अपील खारीज करण्यात आल्याचे मुख्याधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांनी माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर दिनांक २.२.२०११ च्या पत्राने त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र कर

वसुलीच्या संदर्भात श्री. आंबोरकर यांना दिलेल्या सन २००२ ते २००७ या कालावधीत दिलेल्या जप्तीच्या नोटीसच्या प्रती त्यांचा शोध घेऊन त्यांना मिळाल्या नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास जप्तीच्या नोटीसची माहिती उपलब्ध नाही असे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. करिता अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सन २००२ ते २००७ या कालावधीत श्री. आंबोरकर यांचे कर वसुलीचे बाबत केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात कोणत्याही जप्तीच्या नोटीसेस उपलब्ध झालेल्या नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६२७-६२९/५.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४८२/२०११.

श्री. पी. एम. पद्मावार,
बी-१/२०२, शिवराया सोसायटी,
समृध्दी संकूल, सिव्हील लाईन,
अमरावती रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर निबंधक (आस्थापना)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, मध्यवर्ती इमारत, पुणे - १.

श्री. मंगेश तिटकारे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपनिबंधक (आस्थापना)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, मध्यवर्ती इमारत, पुणे - १. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २.६.२०१० चा माहितीचा अर्ज दिनांक ४.६.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या अर्जात शासकीय निवास स्थानाची थकीत भाडे प्रकरणी थकीत असलेल्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने एकूण ४ मुद्यांची माहिती

... २

मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती मुद्येनिहाय काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक ८.६.२०१० च्या पत्रान्वये ३ मुद्यांबाबत माहिती उपलब्ध करुन दिली व एका मुद्यांबाबत (मुद्या ३) माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले व अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर दिनांक ८.७.२०१० रोजी समक्ष माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले.

४. तथापी त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील अपर निबंधक (आस्थापना) यांचेकडे दिनांक ९.७.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १८.८.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. मात्र सदरच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर होते. तथापी जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेऊन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे प्रथम अपील फेटाळलेले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले.

५. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्या नंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दिनांक ४.६.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत म्हणजे दिनांक ८.६.२०१० रोजीच्या पत्राने आणि दिनांक ८.७.२०१० रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६३०-६३१/७.७.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४८३/२०११.

श्री. गणेश रोहिदास खापेकर,
प्रमुख यंत्रचालक (स.फौ.),
बिनतारी संदेश विभाग,
राज्य राखीव पोलीस, बल गट क्र. ४,
हिंगणा रोड, नागपूर - ४४० ०१६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समादेशक कार्यालय,
राज्य राखीव पोलीस, बल गट क्र. ४,
हिंगणा रोड, नागपूर - ४४० ०१६.

श्री. अशोक बगमारे,
जनमाहिती अधिकारी तथा
समादेशक सहाय्यक,
समादेशक कार्यालय,
राज्य राखीव पोलीस, बल गट क्र. ४,
हिंगणा रोड, नागपूर - ४४० ०१६. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२०११)**

### <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा समादेशक, राज्य राखीव पोलीस, बल गट क्रमांक ४ यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन

... २

त्यांना घरभाडे भत्ता, अनुज्ञाप्ती शुल्क व वाहन भत्ता कां बंद केला आहे याची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना दिनांक २४.१.२०११ च्या पत्राने माहिती अधिकारी यांनी असे कळविले की, आपणास या कार्यालयातर्फे गटाबाहेर राहण्याची परवानगी तसेच घरभाडे मंजूर झाल्याचे आदेश निर्गमित न झाल्याने आपणास माहे जून पासून घरभाडे भत्ता बंद करण्यात आला आहे. गटाबाहेर राहून घरभाडे भत्ता मंजूर करणेबाबत आपण अर्ज सादर केला आहे. सदर प्रकरणाबाबत या कार्यालयातर्फे कार्यवाही सुरु असून याबाबत समादेशक यांचे आदेश प्राप्त होताच आपणांस कळविण्यात येईल अशी माहिती त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली. तथापी त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ३१.१.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा समादेशक सहाय्यक, राज्य राखीव पोलीस, बल गट क्रमांक ४ यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ५.१.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही दिनांक २४.१.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. त्यानंतर दिनांक ६.७.२०११ रोजी अपीलकर्त्यास समादेशक यांनी आणखी असे कळविले की, या गटाचे आस्थापनेवर शासकीय निवासस्थान रिक्त असल्याने आपणास शासकीय निवासस्थानाबाहेर राहण्याची परवानगी देता येत नाही अशी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ४.१.२०११ च्या पत्राने व समादेशक यांनी दिनांक ६.७.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४८१/२०११.

श्री. शामदेव काशिरामजी तितरमारे,
प्लॉट नं. २७०, चंदननगर,
पो. हनुमाननगर, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. एल. गुर्जर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. जी. एन. गोंडाणे, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २०.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन, पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन लघुलेखक श्री. वामन तितरमारे व इतर ३ यांचे विरुध्द शिक्षा संदर्भात दिनांक ४.११.२०१० ला विशेष पोलीस महानिरिक्षक यांना पत्र पाठविले होते. त्याबाबत एकूण ३ मुद्यांची माहिती

... २

मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १८.२.२०११ च्या पत्राने अशी माहिती दिली की, प्रस्तुत प्रकरणात आपले दिनांक २०.१.२०११ च्या अर्जानुसार गुन्हा नोंदविणेकरिता प्रक्रिया सुरु आहे असे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. तथापी या माहितीने त्यांचे समाधान झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) यांचेकडे दिनांक २१.२.२०११ रोजी दाखल केले. त्याची सुनावणी दिनांक १७.३.२०११ रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचे सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यास पुन्हा अद्यावत माहिती उपलब्ध करुन दिल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

३. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचे अर्जावर पुन्हा नव्याने चौकशी सुरु करण्यात आलेली आहे व ती चौकशी पूर्ण झाल्यानंतर अपीलकर्त्यास पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, आपल्या अर्जावर पुन्हा नव्याने चौकशी सुरु करण्यात आलेली आहे ती चौकशी पूर्ण होताच आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६३५-६३६/७.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४८०/२०११.**

श्री. शामदेव काशिरामजी तितरमारे,
प्लॉट नं. २७०, चंदननगर,
पो. हनुमाननगर, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. एल. गुर्जर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांच्यावतीने श्री. जी. एन. गोंडाणे, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २१.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन) नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन) नागपूर श्री. वा. क. खरात यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन होणाऱ्या

... २

अक्षम्य दिरंगाईबाबत दिनांक १६.१०.२०१० रोजी त्यांनी तक्रार अर्ज दिला होता. त्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ३.१२.२०१० च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपायुक्त (मुख्यालय) नागपूर यांचेकडे दिनांक २१.२.२०११ रोजी दाखल केले. अपीलाची सुनावणी दिनांक १७.३.२०११ रोजी ठेवण्यात आली व त्या दिवशी अपीलकर्त्यास पुन्हा असे कळविले की, तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), नागपूर शहर श्री. वा. क. खरात यांच्या विरुध्द तक्रार चौकशी श्री. एच. एल. उंबरकर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) यांनी केलेली असून त्या चौकशीचा अहवाल मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पाठविण्याची तजबीज ठेवलेली आहे. तथापी सदरच्या चौकशी अहवालावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना मिळालेली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचेवतीने उपस्थित असलेले पोलीस उपनिरिक्षक यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २१.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ८.११.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयातील कनिष्ठ लिपिक जी-५(२) या शाखेशी संबंधित असल्यामुळे त्या शाखेला दिनांक १५.११.२०१० रोजी पत्र लिहून त्यांचेकडून माहिती मागविली. त्यानंतर पुन्हा जी-५(२) शाखेला दिनांक २२.११.२०१०, दिनांक २९.११.२०१० व दिनांक २.१२.२०१० ला स्मरणपत्र पाठविले. त्यानंतर जी-५(२) शाखेकडून जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २.१२.२०१० रोजी माहिती प्राप्त झाली. त्यानंतर जी-५(२) शाखेने दिलेली माहिती अपीलकर्त्यास दिनांक ३.१२.२०१० च्या पत्रानेउपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले व सदरच्या माहितीमध्ये अपीलकर्त्यास असे कळविले की, तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), नागपूर श्री. वा. क. खरात यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबतचा दिनांक १६.१०.२०१० चा अर्ज चौकशी करिता पोलीस उपआयुक्त, नागपूर यांचेकडे देण्यात आलेला आहे अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. त्यानंतर प्रथम अपील पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), नागपूर शहर यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक

१७.३.२०११ रोजी घेण्यात आली व त्याच दिवशी पुन्हा अपीलकर्त्यास श्री. एच. एल. उंबरकर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) यांचेकडून करण्यात आलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत देण्यात आली आणि चौकशीचा अहवाल मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पाठविण्याची तजबीज ठेवलेली आहे अशी माहिती अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी उपलब्ध करुन दिली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. त्याचप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, सद्य:स्थितीत सदरच्या चौकशीच्या अहवालाची छाननी पोलीस आयुक्त कार्यालयाचे स्तरावर सुरु आहे. सदरची छाननी पूर्ण झाल्यानंतर सदरचा चौकशी अहवाल योग्य त्या कार्यवाहीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जावर चौकशी पूर्ण झालेली असून त्या चौकशी अहवालाची छाननी पोलीस आयुक्त कार्यालय स्तरावर सुरु आहे. त्याची छाननी झाल्यानंतर सदरचा चौकशी अहवाल कार्यवाहीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे पाठविण्यात येईल असे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक हाईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) नागपूर शहर श्री. वा. क. खरात यांच्या विरुध्दच्या तक्रारीच्या चौकशी अहवालाची छाननी पोलीस आयुक्त कार्यालय स्तरावर सुरु आहे ती पूर्ण झाल्यानंतर सदरचा चौकशी अहवाल योग्य त्या कार्यवाहीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे पाठविण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६३७-६४०/७.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४८९/२०११.

श्री. दिनेश हरिदास पाटील,
रिपब्लिकन पँथर्स,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर (रमानगर),
रेल्वे चौकी, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संजीव बा. गाडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
नागपूर.

श्री. सिध्दार्थ गायकवाड,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा विशेष समाज कल्याण अधिकारी,
प्रशासकीय इमारत क्रमांक - १, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.७.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ११.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा विशेष समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन अनुसुचित जाती व नवबौध्दांच्या घटकांसाठी घरकुल योजनेत आपल्या विभागामार्फत निवड झालेल्या लाभार्थीची नागपूर

... २

जिल्हयातील महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत व पंचायत समिती अनुसार यादी देण्यात यावी. तसेच शासनाकडून या घरकुल योजनेसाठी किती अनुदान प्राप्त झाले इत्यादीबाबत त्यांनी एकूण ४ मुद्यावर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २.२.२०११ च्या पत्राने माहिती प्राप्त झाली व त्यामध्ये त्यांना शासनाकडून मिळालेल्या अनुदानाची माहिती त्यांना मिळाली. मात्र या योजनेत निवड झालेल्या पात्र लाभार्थ्यांची यादी त्यांना मिळाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २१.२.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे नंतरही त्यांना या योजनेतील निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा विशेष समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ११.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या ४ मुद्यांची माहिती अपीलकर्त्यास दिनांक २.२.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र या योजनेमध्ये ज्या लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे त्याची यादी त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या योजनेतील लाभार्थ्यांची निवड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नागपूर यांचे मार्फत करण्यात येत असते. त्यामुळे निवड केलेल्या लाभार्थ्यांची यादी त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास दिनांक २.२.२०११ च्या पत्राने कळविले आहे. मात्र या योजनेतील करावयाचे अर्ज जिल्हा विशेष समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांचे मार्फत प्राप्त होत असतात. सदरचे अर्ज जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे पाठविण्यात येत असतात असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी सदरच्या योजनेतील प्राप्त झालेल्या अर्जदाराची यादी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दिनांक ११.१.२०११ चा माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २.२.२०११ च्या

पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. तथापी वर नमुद केल्याप्रमाणे या योजने अंतर्गत जे अर्ज प्राप्त झालेले आहेत त्याची यादी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी या घरकुल योजनेत प्राप्त झालेल्या अर्जदाराची यादी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६४१-६४३/८.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४९२/२०११.**

सौ. रेखाताई राजीव कऱ्हाड,
न्यु आशिर्वादनगर, गिरोला (कारधा),
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. एम. एच. टोणगांवकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. साकोली, जि. भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
साकोली, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २२.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे श्री. चिखलीकर, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३०.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन पं.ह.नं. ५९ मध्ये गट नं. ४६२ व ३७४ हया जागेवर सन १९७७ पासून जबरान जोत असून त्यामधील पट्टेबाबत माहिती मागितलेली होती. तसेच श्रीमती लता वसंता रोकडे, मु. झाडगांव यांचेबाबत तहसीलदार, साकोली यांनी केलेल्या तक्रारीच्या चौकशी

... २

बाबत एकूण ५ मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, साकोली यांचेकडे दिनांक ७.२.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांचेतर्फे उपस्थित असलेले नायब तहसीलदार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक ३०.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने मागितलेली माहिती ही तलाठी, साजा क्रमांक २०, सेंदुरवाफा, ता. साकोली व तलाठी साजा क्रमांक २५, शिवनीबांध यांचेशी संबंधित असल्याने अपीलकर्त्यास दिनांक ११.१.२०११ च्या पत्राने तलाठी, शिवनीबांध यांचेकडून माहिती पाठविण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तलाठी यांचे कडील माहिती अपीलकर्तीस मिळाल्याची त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र इतर माहिती त्यांना मिळाली नाही असे अपीलकर्तीने सांगितले. त्यानंतर तहसीलदार, साकोली यांनी अपीलकर्तीस दिनांक २९.१.२०११ रोजी पत्र लिहून असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीच्या अर्जात आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे त्याचा उल्लेख होत नाही म्हणून आपण दिनांक ३१.१.२०११ ला तहसील कार्यालय, साकोली येथे उपस्थित राहावे असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. मात्र अपीलकर्ती त्यांचे कार्यालयात उपस्थित झाली नाही. त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, साकोली यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.३.२०११ रोजी निर्गमित करण्यात आला व त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांनी तात्काळ अपीलार्थीला आपले कार्यालयात बोलावून कोणती माहिती पाहिजे याचे निरिक्षण करण्याकरिता अभिलेख उपलब्ध करुन द्यावा व त्यांनी निरिक्षण केल्यानंतर आवश्यक माहिती त्यांना तात्काळ द्यावी असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आला. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस माहितीचे निरिक्षण करण्याकरिता त्यांचे कार्यालयात बोलाविले. परंतु त्या उपस्थित झाल्या नाही म्हणून त्यांना माहिती देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. मात्र त्यावर अपीलकर्तीचे असे म्हणणे आहे की, त्या वेळोवेळी तहसील कार्यालयात माहिती घेण्यासाठी हजर झाल्या मात्र त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

... ३

४. अपीलकर्ती तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीचा दिनांक ३०.१२.२०१० चा माहिती अर्जाला अनुसरुन तलाठी, शिवनीबांध यांनी त्यांचेकडील माहिती अपीलकर्तीस दिनांक १८.१.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली दिसते. मात्र इतर मुद्यांची माहिती ही तहसीलदार कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांनी अपीलकर्तीस निरिक्षणानंतर सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती यांनी दिनांक ११.७.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे वेळी हजर राहून प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे त्यांना पाहिजे असलेल्या अभिलेखाचे निरिक्षण करुन घ्यावे व त्यांनी निरिक्षण केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेली माहिती तहसीलदार यांनी तात्काळ विनामुल्य अपीलकर्तीस उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ती जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाल्यानंतर तहसीलदार, साकोली यांनी अपीलकर्तीस त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे अभिलेख निरिक्षणासाठी त्यांनी उपलब्ध करुन द्यावेत व अपीलकर्तीने निरिक्षण केल्यानंतर त्यांना पाहिजे असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

४) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६४४-६४६/८.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८०२/२०१०.**

श्री. हरिशचंद्र दिनेश वारणे,
पेंशननगर, पोलीस लाईन टाकळी,
पोलीस क्वॉर्टरच्या मागे, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुर्यवंशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय,
नागपूर.

श्री. कमलाकर हट्टेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३,
६ वा माळा, प्रशासकीय इमारत,
सिव्हील लाईन, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे कडील दिनांक २०.६.२०११ च्या आदेशाला अनुसरुन अपीलकर्ता व उत्तरवादी हे दिनांक ११.७.२०११ रोजी आयोगाचे कार्यालयात सुनावणीसाठी उपस्थित राहिले. आजच्या सुनावणी अपीलकर्ता यांचे वतीने ॲड. समुद्रे हजर होते व जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर हे उपस्थित होते व प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक, भुमी अभिलेख, नागपूर हे उपस्थित होते.

२. अपीलकर्ता यांचे वतीने ॲड. समुद्रे यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे अधिक्षक, भुमी अभिलेख, नागपूर यांचे कोर्टातील अपील

... २

क्रमांक ३८९/२००३ मधील दिनांक १४.१०.२००३ च्या निर्णयाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती व त्यामध्ये दुरुस्त नकाशाची प्रत मागितलेली होती. तथापी त्यांना दुरुस्त नकाशाची प्रत अद्याप ा मिळालेली नाही तसेच प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे त्यांना दुरुस्त नकाशाची प्रत मिळावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यास प्रथम अपीलातील निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या संदर्भात त्यांना काही अडचणी आलेल्या आहेत. त्याबाबत त्यांनी जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, नागपूर यांचेकडे दिनांक ११.१.२०१० च्या पत्राने मार्गदर्शन मागितलेले होते. तथापी त्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले नाही म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयावरती त्यांनी कार्यवाही केली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, नागपूर यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या संदर्भात आहे. प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना मार्गदर्शन मागितलेले आहे. याबाबत प्रस्तुत प्रकरणात पुन्हा अभिलेख तपासणी करुन त्याची खात्री करणे आवश्यक आहे. म्हणून ६० दिवसाचे मुदतीत संपूर्ण अभिलेखाची तपासणी व खात्री करुन अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कार्यवाही करणे शक्य होईल असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले आणि या बाबीस अपीलकर्त्याचे वकीलांनी देखील आयोगासमोर संमती दिली.

५. अपीलकर्ता यांचे वकील, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ६० दिवसांचे आंत अभिलेख तपासून व खात्री करुन अपीलकर्त्याने मागितलेली माहितीच्या संदर्भात योगय ती कार्यवाही करुन त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक व न्यायोचित होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ६० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अभिलेख तपासून व खात्री करावी व त्यानंतर अपीलकर्त्यास केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६४७-६४९/११.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४९८/२०११.**

श्री. तुषार धनंजय मंडलेकर,
२०, एनआयटी कॉम्प्लेक्स,
हिल रोंड, गांधीनगर, नागपूर - ४४० ०१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रमांक १, नागपूर.

श्री. पी. पी. धरमशी,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
सिताबर्डी विभाग, नागपूर शहर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. बंटेवाड, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३०.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन सिताबर्डी पोलीस स्टेशन येथील दाखल झालेले अपराध क्रमांक २१४/२००६, अपराध क्रमांक २७६/२००६, व अपराध क्रमांक ४०८/२००६ संदर्भातील कागदपत्राचे निरिक्षण मागितले होते. तसेच धारिकेतील टिपणीची प्रत

... २

मागितलेली होती. त्याचप्रमाणे सर्व बेल, अप्लीकेशन आणि अपील केस व बेल मान्य झालेल्या न्यायालयीन आदेशाचे निरिक्षण मागितलेले होते. तसेच दोषारोपपत्राच्या कागदपत्राचे निरिक्षण त्यांनी मागितलेले होते. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १४.९.२०१० च्या पत्राने असे कळविले की, अपराध क्रमांक २१४/२००६, अपराध क्रमांक २७६/२००६ तसेच अपराध क्रमांक ३२९/२००६ ही ३ प्रकरणे मा. कोर्टात न्यायप्रविष्ठ असल्याने व तपासाची कागदपत्रे प्रत्यक्ष अर्जदारास पाहणे असल्याने मा.जे.एम.एफ.सी. साहेब कोर्ट नं. २ नागपूर येथून घ्यावी. तसेच अपराध क्रमांक ४०८/२००६ हा गुन्हा पोलीस तपासावर आहे असे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. मात्र कोणत्याही कागदपत्राचे त्यांना निरिक्षण दिले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्रमांक १, नागपूर शहर यांचेकडे दिनांक १९.१०.२०१० रोजी दाखल केले त्याची सुनावणी झाली व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक २५.११.२०१० च्या प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपराध क्रमांक २१४/२००६, अपराध क्रमांक २७६/२००६, अपराध क्रमांक ३२९/२००६ यामध्ये अपीलकर्ता हे स्वत: फिर्यादी आहे म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास गुन्हयाबाबत माहिती देण्यात यावी तसेच अपराध क्रमांक ४०८/२००६ मध्ये गुन्हे तपासाचा अहवाल देण्यात यावा असा प्रथम अपीलाचा निर्णय झाल्यानंतरही जनमाहिती यांनी त्यांना कोणत्याही कागदपत्राचे निरिक्षण दिलेले नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने आयोगासमोर सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३१.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती पोलीस स्टेशन, सिताबर्डीशी संबंधित असल्याने अर्जाचे संदर्भात माहिती मिळण्यासाठी अपीलकर्त्याचा अर्ज दिनांक २.९.२०१० रोजी पोलीस स्टेशन, सिताबर्डीला पाठविण्यात आला. पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन सिताबर्डी यांनी दिनांक ८.९.२०१० अन्वये पाठविलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यावरुन दिनांक १४.९.२०१० अन्वये अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली. तथापी अपीलकर्त्याचे त्या माहितीने समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक १९.१०.२०१० रोजी पोलीस उपआयुक्त,

परिमंडळ क्रमांक १, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २५.११.२०१० रोजी घेण्यात आली व निर्णय देण्यात आला निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्ता यांनी अपील अर्जात माहितीचे मुद्ये उपस्थित केलेले आहे की, अपराध क्रमांक २१४/२००६, अपराध क्रमांक २७६/२००६ व अपराध क्रमांक ३२९/२००६ यामध्ये अर्जदार स्वतः फिर्यादी आहे असे नमुद केले असल्यामुळे अर्जदार यांना जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास गुन्हयाची माहिती देण्यात यावी. तसेच अपराध क्रमांक ४०८/२००६ मध्ये गुन्हे तपासाचा अहवाल देण्यात यावा असे आदेश प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी तथ सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर यांनी दिनांक २०.१२.२०१० अन्वये अपीलकर्त्यास पोष्टाद्वारे माहिती पाठविली असून अपीलकर्त्याने सदरची माहिती प्राप्त केल्याबाबत स्वाक्षरी केलेली पोच त्यांचे दप्तरी आहे असे त्यांनी नमुद केले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १४.९.२०१० च्या पत्राने माहितीचे संदर्भात उत्तर पाठविले दिसते. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानंतर दिनांक २०.१२.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांनी दाखल केलेल्या गुन्हया संदर्भात माहिती दिलेली दिसून येते. तसेच अपराध क्रमांक ४०८/२००६ मध्ये गुन्हे तपासाचा अहवाल अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेला दिसून येतो. मात्र अपीलकर्त्याचे याबाबत असे म्हणणे आहे की, त्यांनी या अपराधाच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातील रेकॉडची निरिक्षण करण्याची त्यांची मागणी आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या या गुन्हा संबंधिचा रेकॉर्ड निरिक्षणासाठी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी रेकॉर्डच्या निरिक्षणासाठी तारीख व वेळ लेखी कळवावे व अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात हजर झाल्यानंतर आवश्यक त्या रेकॉर्डचे निरिक्षण करु देण्यासाठी रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४९७/२०११.**

श्री. शेख इत्तेखर शेख मंसूर,
तकीया, दिवानशहा बापूजीका आखाडा,
ताज मंजील, मोमीनपुरा, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती अख्तर उन्नीसा खान
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
गुलाब नबी आजाद उर्दु हायस्कूल,
गिट्टीखदान, बोरगांव रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्रीमती पतंगे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २५.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, गुलाब नबी आझाद उर्दु हायस्कूल, गिट्टीखदान, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन जानेवारी २००६ पासून सन २०१० पर्यंत शाळेत नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती मागितलेली

... २

होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २५.११.२०१० रोजी माहिती प्राप्त झाली. मात्र त्यांच्या आई या शाळेत शिपाई पदावर कार्यरत होत्या. ती मय्यत झाल्यानंतर तिच्या जागेवर अनुकंपा तत्वाखाली त्यांना नोकरी देण्यात आली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांचे खारीज करण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २५.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे अपीलकर्त्याने केलेला नव्हता. अपीलकर्त्याने सदरचा अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे केला होता. त्यांचेकडून अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक ४.११.२०१० च्या पत्राने पाठविण्यात आला. सदरचा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १५.११.२०१० रोजी प्राप्त झाला व अपीलकर्त्याने मागितलेली माहिती दिनांक २५.११.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगासमोर मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, या शाळेत त्यांची आई शिपाई या पदावर कार्यरत होती. ती मय्यत झाल्यामुळे त्यांचे जागेवर अनुकंपा तत्वावर नोकरी शाळेने उपलब्ध करुन द्यावी असे त्यांचे म्हणणे आहे. तथापी अपीलकर्त्यास अनुकंपा तत्वावर नौकरी देण्याबाबतची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. त्याकरिता अपीलकर्त्याने योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २५.११.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४९६/२०११.

श्री. प्रकाश रामदेव जायस्वाल,
जय बम्लेश्वरी कंपाऊंड,
आमगांव रोड, फुलचुर, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. के. वाडेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
फुलचुर नाका, जि. गोंदिया.

श्री. अविनाश प्रभात राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
फुलचुर नाका, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.७.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर करुन आर.टी.ओ. कार्यालय ज्या ठिकाणी कार्यरत आहे त्या जागे संदर्भात माहिती मागितलेली होती. तसेच सदरच्या जागेचे क्षेत्रफळ

... २

व सदरच्या जागेची दिलेली नुकसान भरपाई इत्यादीबाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २४.१२.२०१० च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती ही समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया यांचेकडे दिनांक २१.१.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ६.१२.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने आर.टी.ओ. कार्यालयाचे जागे संबंधी माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व जिल्हाधिकारी, भंडारा यांनी आर.टी.ओ. गोंदिया कार्यालयास दिनांक ७.१२.१९८३ च्या आदेशान्वये शासकीय जमीन दिलेली आहे. या आदेशामध्ये जमीनीचा तपशील, सर्वे नंबर व एकूण दिलेल्या जागेचे क्षेत्रफळ इत्यादीची माहिती या आदेशात आहे. म्हणून सदरच्या आदेशाची प्रत अपीलकर्त्यास दिनांक २४.१२.२०१० च्या पत्राप्रमाणे उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र सदरची जमीन ही कोणाची आहे व त्यास किती नुकसान भरपाई दिली आहे त्याची माहिती त्यांना मिळाली नाही असे अपीलकर्त्याने आयोगा समोर सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची जमीन ही शासकीय जमीन आहे व मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडील दिनांक ७.१२.१९८३ च्या आदेशान्वये आर.टी.ओ. कार्यालयास जी जमीन देण्यात आलेली आहे. सदरची जमीन ही कोणत्याही खाजगी व्यक्तीची नसल्यामुळे त्यांचे कार्यालयाकडून कोणत्याही व्यक्तीला जमीनीचे नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही व ही माहिती अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, आर.टी.ओ. गोंदिया कार्यालयास जिल्हाधिकारी, भंडारा यांचे कार्यालयाकडून दिनांक ७.१२.१९८३ च्या

... ३

आदेशान्वये शासकीय जमीन मिळालेली आहे. सदरची जमीन ही शासकीय असल्यामुळे कोणत्याही खाजगी व्यक्तीला जमीनीचा मोबदला किंवा नुकसान भरपाई आर.टी.ओ. कार्यालयाकडून देण्यात आलेला नाही असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, आर. टी. ओ. कार्यालय, गोंदिया या कार्यालयाला जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडून दिनांक ७.१२.१९८३ च्या आदेशान्वये शासकीय जमीन मिळालेली आहे. त्यामुळे कोणत्याही खाजगी व्यक्तीला त्यांचे कार्यालयाकडून जमीनीचा मोबदला किंवा नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६५७-६५९/१२.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५०४/२०११.

श्री. विनोद वासुदेव राठोड,
द्वारा - बबलू कनोजिया,
रविनगर शॉप नं. २, नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. यु. डी. आडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, घाटंजी,
जि. यवतमाळ.

श्री. केशव गोविंदराव दांदळे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत किन्ही,
ता. घाटंजी, जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.७.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २२.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, किन्ही, ता. घाटंजी, जि. यवतमाळ यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन किन्ही गावात जलस्वराज योजनेसाठी एकूण किंती निधी मिळाला आहे. त्यापैकी एकूण किती खर्च झालेला आहे

... २

व विहिर खोदकाम, बांधकाम, मोटारपंप, पाईपलाईन इत्यादीवर झालेला खर्चाची माहिती संबंधाने त्यांनी एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकरी यांचेकडून दिनांक १६.१.२०११ च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, घाटंजी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहिती अर्जात किन्ही ग्रामपंचायत मार्फत जलस्वराज योजनेसाठी आलेल्या निधीचा व झालेल्या खर्चाच्या संदर्भात एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचेशी संबंधीत असल्याचे त्यांचेकडून ती माहिती मागितली. या समितीकडून त्यांना माहिती प्राप्त झाली व सदरची माहिती त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक १६.१.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र माहितीतील मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भात जलस्वराज योजनेच्या अंमलबजावणी संबंधात त्यांना कोणतीही माहिती प्रापत झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर गट विकास अधिकारी, घाटंजी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, जलस्वराज प्रकल्प योजनेच्या अंमलबजावणीसाठी त्यांचेकडे शासन निर्णय दिनांक ३०..३.२०११ ची प्रत त्यांचेकडे उपलब्ध आहे व त्यामध्ये या योजनेच्या संदर्भात कालावधी वाढवून दिलेला आहे. त्याची प्रत त्यांनी अपीलकर्त्यास आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. सदरच्या शासन निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांनी आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास जलस्वराज प्रकल्प योजनांतर्गत झालेल्या विविध बाबींवरील खर्चाचा तपशील दिलेला आहे त्याची प्रत दिल्याचे सुनावणीत दिसून आले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.१०.२०१० चा माहिती अर्जाला अनुसरुन

जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १६.१.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असून मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भात शासन निर्णयाची प्रत आयोगाचे समोर उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५०६/२०११.**

श्री. दत्तुजी पुंडलिकराव निंबुळकर,
तर्फे ॲड. सौ. जे. डी. गायकवाड,
मु. पो. मनसर, ता. रामटेक, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, पारशिवनी,
जि. नागपूर.

श्री. सुरेंद्र बोढाळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामपंचायत, बिटोली, पो. नवेगांव खैरी,
ता. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. डी. आर. खोरगे, कृषी अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचे वतीने सौ. जे. डी. गायकवाड यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केलेला आहे. तथापी आजच्या सुनावणीस अपीलकर्ता किंवा सौ. जे. डी. गायकवाड, वकील हया उपस्थित राहिल्या नाही म्हणून प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, बिटोली, ता. पारशिवनी, जि. नागपूर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्याचे कार्यालयाकडे दिनांक २६.११.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने त्या अर्जामध्ये श्री. दत्तुजी पुंडलिकराव निंबुळकर आणि श्री. नरेंद्र पुंडलिकराव निंबुळकर दोन्ही रा. बिटोली, ता. पारशिवनी, जि. नागपूर यांनी दिनांक ३०.७.२०१० ला ग्रामपंचायत बिटोली येथे श्री. रामभाऊ ठाकरे यांच्या विरुध्द स्वयंपाक घराच्या भिंतीवरुन फाटे लावून गुरे बांधण्यासाठी झोपडी व भिंतीलाच लागून जलावू लाकडे ठेवण्याबाबत तक्रार केली होती. त्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची त्यांनी माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक ११.१२.२०१० च्या पत्राने स्पीड पोस्टाद्वारे ग्राम पंचायतनी या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसचिव यांनी आयोगासमोर सांगितले व सदरची माहिती अपीलकर्त्यास दिनांक ११.१२.२०१० रोजी स्पीड पोस्टाद्वारे पाठविल्याचा पोस्टाचा पुरावा आयोगासमोर दाखविला.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने उपस्थित झालेले कृषि अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचे कार्यालयाकडे दाखल झाले नाही. त्याबाबत त्यांनी त्यांचे कार्यालयातील आवक नोंद वहीची खात्री केली व त्यावरुन प्रथम अपील आवक नोंद वहीमध्ये प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही. त्याबाबत संबंधित कनिष्ठ सहाय्यक यांनी आयोगासमोर सादर केले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील खंड विकास अधिकारी यांचेकडे दाखल झाले नसल्याने त्याची सुनावणी घेऊन निर्णय देण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही असे आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसचिव यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.११.२०१० चा माहितीच्या अधिकाराखालील अर्जाची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ११.१२.२०१० च्या पत्राने स्पीडपोस्टाद्वारे अपीलकर्त्यास पाठविली असल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५०५/२०११.**

सौ. मंजू अरुण जांगडे,
वार्ड नं. २, मु. पो. खापा,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. डी. एन. बालपांडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
नगर परिषद राजेंद्र हायस्कूल, खापा,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक २४.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्रीमती लिमजे, कनिष्ठ सहाय्यक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ११.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नगर परिषद राजेंद्र हायस्कूल, खापा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जास अनुसरुन अपीलकर्ती यांनी आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे लेखी

... २

निवेदन सादर केलेले आहे. मुख्याध्यापक, नगर परिषद राजेंद्र हायस्कूल, खापा यांचेकडून मला या प्रकरणातील संपूर्ण माहिती मिळालेली आहे. माझे समाधान झालेले आहे. तरी आपणास नम्र विनंती करण्यात येते आहे की, ही अपील खारीज करण्यात यावी. यावर माझा कोणताही आक्षेप (उजर) राहणार नाही असे निवेदन अपीलकर्ती यांनी सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५१२/२०११.

श्री. रंजीत राजेंद्र बागडे,
मु. पो. करटी बुज,
ता. तिरोडा, जि. गोंदिया - ४४१ ९११. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संजीव गाडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. जी. पी. मोहबंशी,
जनमाहिती अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
ता. जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.७.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ६.१०.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १५.१०.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रगती बहुउद्देशिय शैक्षणिक संस्था, तिरोडा, जि. गोंदिया अंतर्गत ग्रामीण धर्मदाय दवाखाना व ग्रामीण धर्मदाय फिरता दवाखना, पालडोंगरी, पो. करटी बुज, ता. तिरोडा, जि. गोंदिया संचालित प्रकल्पाच्या अनुदानाबाबत सादर केलेला प्रस्ताव, या प्रकल्पात कार्यरत कर्मचाऱ्यांची यादी व पदाची

... २

पात्रता, इत्यादी संबंधित माहिती मागितलेली होती. सदर माहिती ही प्रगती बहुद्देशिय शैक्षणिक संस्था यांचेशी संबंधित असल्याने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज दिनांक ३.११.२०१० च्या पत्राने कार्यालय अधिक्षक, प्रगती रुरल चॅरिटेबल हॉस्पीटल, पालडोंगरी, ता. तिरोडा यांचेकडे व संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचेकडे पाठविला व त्यामध्ये अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविण्यात आले असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे दिनांक ६.१२.२०१० रोजी दाखल केले. सदरचे प्रथम अपील त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २३.१२.२०१० रोजी प्राप्त झाले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ३०.१२.२०१० रोजी घेण्यात आली. तथापी त्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रगती बहुउद्देशिय शैक्षणिक संस्था, तिरोडा यांचेशी संबंधित असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी त्या संस्थेकडे माहितीचा अर्ज पाठवून अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याचे दिनांक ३.११.२०१० च्या पत्राने निर्देश दिले. तसेच अपीलकर्त्याने संस्थेशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी असेही आदेश प्रथम अपीलात नमुद केले व जनमाहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही ही योग्य असल्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गोंदिया यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज प्रगती बहुउद्देशिय शैक्षणिक संस्था, तिरोडा यांचेकडे दिनांक ३.११.२०१० च्या पत्राने पाठविला होता व अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविले होते. तथापी प्रगती बहुउद्देशिय शैक्षणिक संस्थेच्या जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आजपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. सदरच्या संस्थेचे हॉस्पीटलला केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त होत असल्याने सदरच्या संस्थेने अपीलकर्त्यास माहिती देणे आवश्यक आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गोंदिया यांनी सदरच्या संस्थेकडून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयाकडे मागवावी व संस्थेकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गोंदिया यांनी अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती प्रगती बहुउद्देशिय शैक्षणिक संस्था, तिरोडा, जि. गोंदिया यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गोंदिया यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक ६.१०.२०१० चा माहितीचा अर्ज अध्यक्ष/सचिव, प्रगती बहुउद्देशिय शिक्षण संस्था, तिरोडा व कार्यालय अधिक्षक, प्रगती रुरल चॅरिटेबल हॉस्पीटल, पालडोंगरी, ता. तिरोडा, जि. गोंदिया यांचेकडे दिनांक ३.११.२०१० च्या पत्राने पाठवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले होते. तथापी जनमाहिती अधिकारी प्रगती बहुउद्देशिय शिक्षण संस्था, तिरोडा यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसाचें मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी प्रगती बहुद्देशिय शिक्षण संस्था, तिरोडा यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये १००००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत सादर करावा.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गोंदिया यांनी प्रगती बहुउद्देशिय शिक्षण संस्था, तिरोडा, जि. गोंदिया यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६६८-६७०/१४.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५१७/२०११ अपील क्रमांक ५१८/२०११.**

श्री. विनोद गजानन भांडारकर,
मु. पो. ढाकणी,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. जि. गोंदिया.

श्री. एम. एल. बारस्कर,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
ता. जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत. दोन्ही द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता हे एकच आहेत व त्याचप्रमाणे माहितीचा विषय देखील सारखाच आहे व उत्तरवादी हे देखील एकच आहेत. म्हणून दोन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली आणि एकत्रित निर्णय देण्यात आला.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, गोंदिया यांचेकडे माहितीचा अर्ज दिनांक २१.१२.२०१० रोजी सादर करुन अनुक्रमांक ६०/एलईएन/३९/८६-८७ गजानन पैकन भांडारकर, मु. पो. ढाकणी यांच्या दिनांक १२.९.१९८९ ला चाललेल्या अतिक्रमण प्रकरणातील संपूर्ण दस्ताऐवज यांच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती

उपलब्ध नाही असे कळविण्यात आले म्हणून त्यांनी तहसीलदार, गोंदिया यांचेकडे दिनांक २२.१.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आले व जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नसल्याबाबतची कार्यवाही कायम ठेवली. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्यांचा दिनांक २१.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे २० वर्षापुर्वीची असल्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध त्यांचे कार्यालयात त्याचप्रमाणे अभिलेखागारात व जिल्हा अभिलेखागारात घेण्यात आला. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे कोणतेही दस्तऐवज किंवा नस्ती त्यांना आढळून आली नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दिनांक २२.१.२०११ रोजी तहसीलदार, गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीचा शोध घेऊनही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ४.२.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्यामुळे व तसे अपीलकर्त्यास कळवून प्रथम अपील निकाली काढण्यात आले.

४. याबाबत अपीलकर्त्याने आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी माहितीच्या अर्जासोबत तहसील कार्यालय, गोंदिया कडून प्राप्त झालेल्या सन १९८९ च्या नोटीसच्या प्रती जोडलेल्या होत्या. त्यावरुन सन १९८९ मध्ये तहसील कार्यालयामार्फत सदरच्या अर्जावर कार्यवाही सुरु होती असे अपीलकर्त्याने सांगितले. म्हणून तहसील कार्यालयात सन १९८९ च्या रेकॉर्डची तपासणी केल्यास त्यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध होऊ शकेल असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेला रेकॉर्डची अपीलकर्त्याने स्वत: निरिक्षण करण्यासाठी अपीलकर्त्यास रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्यात येईल व म्हणून अपीलकर्ता निरिक्षणासाठी कार्यालयात हजर झाल्यास त्यांना रेकॉर्डचे निरिक्षण देण्यात येईल असे नायब तहसीलदार यांनी आयोगापुढे सांगितले.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयातील रेकॉर्डचे निरिक्षण करण्यासाठी आवश्यक तो रेकॉर्ड उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे दोन्ही अपीले अंशत मंजूर करण्यात येत आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ५१७/२०११ व अपील क्रमांक ५१८/२०११ ही दोन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या रेकॉर्डचे निरिक्षण करण्यासाठी अपीलकर्त्यास लेखी पत्राद्वारे कळवावे व अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात रेकॉर्डचे निरिक्षण करण्यासाठी हजर झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक तो रेकॉर्ड निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावा व निरिक्षणानंतर माहिती उपलब्ध असल्यास अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापी निरिक्षणानंतरही रेकॉर्ड उपलब्ध न झाल्यास जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

३) जनमाहिती अधिकारी यांचेकडून रेकॉर्ड निरिक्षणाचे संदर्भात अपीलकर्त्यास लेखी पत्र प्राप्त झाल्यानंतर दिलेल्या दिवशी कार्यालयीन वेळेत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात अपीलकर्त्या यांनी हजर राहून रेकॉर्डचे निरिक्षण करुन घ्यावे व रेकॉर्डच्या निरिक्षणानंतर त्यांना माहिती उपलब्ध झाल्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडून विनामुल्य माहिती प्राप्त करुन घ्यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६७१-६७३/१४.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५२५/२०११.**

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड,
ता. जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (नि)
मुख्य वनसंरक्षक (प्रा)
जुनी पी.एम.टी. बिल्डींग,
स्वारगेट, पुणे - ४११ ०३७.

श्री. जी. शं. आगलावे,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यालय अधिक्षक,
मुख्य वनसंरक्षक (प्रा)
जुनी पी.एम.टी. बिल्डींग,
स्वारगेट, पुणे - ४११ ०३७. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२०११)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, मुख्य वनसंरक्षक (प्रा), पुणे यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक

... २

७.१०.२९८० पासून दिनांक १८.११.२००३ पर्यंत त्यांचे कार्यालयातील तृतीय व चतुर्थ श्रेणीतील सरळ सेवेने भरती करण्यात आलेल्या कर्मचा-यांची एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. त्यानुसार त्यांनी माहितीचे शुल्क रुपये ४५/- जनमाहिती अधिकारी यांचेकडे पाठविले व त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक २२.१.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील खारीज झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, मुख्य वनसंरक्षक (प्रा), पुणे यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २३.११.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती आस्थापना शाखेशी संबंधित असल्याने त्यांचेकडून माहिती काढण्यात आली व आस्थापना शाखेने जनमाहिती अधिकारी यांचेकडे सदरची माहिती दिनांक ९.१२.२०१० रोजी अपीलकर्त्यास देण्यासाठी पाठविली. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क रुपये ३०/- पोस्टेज खर्च रुपये ३०/- असे एकूण रुपये ६०/- शुल्क भरण्याबाबत चलान तयार करुन पाठविली. त्यावर अर्जदाराने दिनांक ११.१.२०११ रोजी माहितीसाठी झेरॉक्स खर्च रुपये ३०/- व पोस्टेज साधारण रुपये १५/- असे रुपये ४५/- चा मनीऑर्डर पाठविला. त्यानंतर अपीलकर्त्यास दिनांक १४.१.२०११ च्या पत्राने मुद्या क्रमांक १ ते ३ ची माहिती अर्जदारास सर्वसाधारण टपालाद्वारे पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र सदरच्या माहितीमध्ये बिंदूनामावलीच्या प्रती त्यांनी पाठविलेल्या आहेत. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात बिंदूनामावलीमधील नोंदीमध्ये सर्व माहितीचा तपशील उपलब्ध आहे. तो बिंदूनामावलीचा तपशील जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर समजावून सांगितला. त्यामध्ये कर्मचा-यांचे नांव, संवर्ग, त्यांची जात होती. पदोन्नतीच्या संदर्भात सर्व माहितीचा तपशील त्यात उपलब्ध असल्याचे दिसून आले व त्याबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले.

... ३

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६७४-६७६/१५.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५२७/२०११.**

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड,
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जी. डी. वळसे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (नि व मु)
मुख्य वनसंरक्षक (प्रा)
वन भवन, उस्मानपूरा, रेल्वे स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५.

श्री. एल. सी. कोटूरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यालय अधिक्षक,
मुख्य वनसंरक्षक (प्रा)
वन भवन, उस्मानपूरा, रेल्वे स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ११.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री. लक्ष्मीकांत चंदुलाल कोटूरकर, कार्यालय अधिक्षक यांच्या सेवा विषयक एकूण ६ मुद्यांची माहिती

... २

मागितलेली होती. त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १०.३.२०११ च्या पत्राने माहिती पाठविली. मात्र त्यामध्ये मुद्या क्रमांक १ ची प्रथम नियुक्तीच्या आदेशाची प्रत त्यांना मिळाली नाही व मुद्या क्रमांक २ च्या पदोन्नतीच्या संदर्भात माहिती मिळाी नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ११.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयात दिनांक २०.१२.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास त्यांच्या कार्यालयाकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती दिनांक १५.१.२०११ च्या पत्राने पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र मुद्या क्रमांक १ च्या संदर्भात प्रथम नियुक्तीच्या आदेशाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही व पदोन्नतीच्या संदर्भात माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुद्या क्रमांक १ च्या संदर्भात प्रथम नियुक्ती आदेशाची सन १९८२ ची प्रत आता आढळलेली आहे. तसेच पदोन्नतीच्या संदर्भातील आदेश देखील आढळलेला आहे म्हणून सदरच्या दोन्ही मुद्यांची माहिती अपीलकर्त्यास आयोगासमोर त्यांना उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५१९/२०११.

श्रीमती डॉ. नैनतारा दुर्गादास वासुदेव,
द्वारा - किड्स वर्ल्ड स्कूल, २४७/२ पोलीस लाईन टाकळी मागे,
एकता ॲन्ड बसेरा अपार्टमेंट, नागपूर - ४४० ०१३. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. भिवगडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
मंगळवारी झोन नं. १०,
महानगरपालिका, छावणी, नागपूर.

श्री. व्ही. डब्ल्यू. गभणे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, लोककर्म विभाग,
मंगळवारी झोन नं. १०,
महानगरपालिका, छावणी, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २१.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती यांचेवतीने श्री. एस. आर. माटा, वकील हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ३०.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, मंगळवारी झोन क्रमांक १०, नागपूर महानगरपालिका यांचेकडे एकूण ४ अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली

... २

होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांचे वकील यांनी आयोगाकडे लेखी निवेदन सादर करुन अपीलकर्ती यांना आज दिनांक १५.७.२०११ रोजी माहिती प्राप्त झाली असल्याने अपील मागे घेत असल्याचे निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६७९-६८०/१५.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५२१/२०११.

श्री. रमेश रामजी राठोड,
२०, विज्ञान नगर, मानेवाडा,
नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
होम्योपॅथीक हॉस्पीटल व कॉलेज,
शिरपूर, जि. धुळे - ४२५ ४०५.

श्री. डॉ. संजय रुद्रे,
जनमाहिती अधिकारी तथा
वरिष्ठ प्राध्यापक,
होम्योपॅथीक हॉस्पीटल व कॉलेज,
शिरपूर, जि. धुळे - ४२५ ४०५. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, होम्योपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पीटल, शिरपूर, धुळे यांचेकडे कु. अश्विनी साईनदास वंजारी हया दिनांक १२.४.२००७, दिनांक १४.४.२००७ व दिनांक १४.४.२००७ रोजी आपल्या मेडिकल कॉलेजमध्ये हजर होती किंवा कसे त्याबाबतची

... २

माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी सदर प्रकरणी माहिती अर्जात मागितलेली माहिती प्राप्त झाली असल्याने अपील मागे घेत असल्याचे तोंडी निवेदन केले असून रोजनाम्यावर स्वाक्षरी केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५२८/२०११, अपील क्रमांक ५२९/२०११, अपील क्रमांक ५३०/२०११, अपील क्रमांक ५३१/२०११, व अपील क्रमांक ५३२/२०११.**

श्री. राजेश नवलकिशोर ठाकूर,
विशाखा निवास, अजय नगर,
अंबाझरी हिल टॉप, नागपूर - ४४० ०३३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. पी. सानप,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, हिंगणा, जि. नागपूर.

श्री. आर. सी. साळुंके,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत सावंगी (देवळी)
ता. हिंगणा, जि. नागपूर.

श्री. प्रविण सु. देशमुख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, हिंगणा, जि. नागपूर.

कु. आय. जी. राठोड,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत दाभा (आगरगांव),
ता. हिंगणा, जि. नागपूर.

श्री. आर. आर. रहाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत नागलवाडी,
ता. हिंगणा, जि. नागपूर.

... २

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती, हिंगणा, जि. नागपूर.

श्री. शामराव ग. भिसे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत ईसासनी,
ता. हिंगणा, जि. नागपूर.

श्री. व्ही. डब्ल्यू. भापकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती, हिंगणा, जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत टाकळघाट,
ता. हिंगणा, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.७.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२०११ रोजी ३ द्वितीय अपीले व दिनांक २८.३.२०११ रोजी २ द्वितीय अपीले असे एकूण ५ द्वितीय अपीले राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत. अपील क्रमांक ५३१/२०११ मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. पी. यु. खंडाळे, कक्ष अधिकारी, पंचायत समिती, हिंगणा हे हजर आहेत. अपील क्रमांक ५३२/२०११ मध्ये जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक हे मेडीकल रजेवर असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाही. प्रस्तुत ५ ही अपील प्रकरणात अपीलकर्ता हे एकच आहेत व माहितीचा विषय देखील एकच असल्यामुळे ५ ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यात आले व खालील प्रमाणे एकत्रित निर्णय देण्यात आला.

२. **अपील क्रमांक ५२८/२०११** अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सावंगी (दे.) ता. हिंगणा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ग्रामपंचायत कार्यालयाची रचना व ग्रामपंचायतीच्या कार्याबद्दलची माहिती तसेच ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची माहिती इत्यादी बाबत एकूण १३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सावंगी (देवळी) यांचेकडून दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने १३ मुद्यांची माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ५.२.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.३.२०११ रोजी देण्यात आला व त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्यास नेमकी कोणती माहिती पाहिजे याबाबत स्पष्ट कळविणे आवश्यक होते. परंतु अपीलकर्त्याने स्पष्ट कोणती माहिती पाहिजे आहे हे कळविले नाही म्हणून अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी यांना स्पष्ट माहिती मागावी व माहिती अधिकारी यांनी नियमाने माहितीचे शुल्क भरुन घेऊन अपीलकर्त्यास ७ दिवसांत माहिती द्यावी असे प्रथम अपीलाचे निर्णयात नमुद केले. तथापी त्यांना मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांना विनामुल्य माहिती मिळावी असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सावंगी देवळी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने एकूण १३ मुद्यांवर ग्रामपंचायतीच्या संदर्भात माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने एकूण १३ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र दिनांक २०.१.२०११ ची माहिती त्यांना दिनांक २६.२.२०११ रोजी प्राप्त झाली. सदरची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने पाठविली आहे. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची होती म्हणून अपीलकर्त्याने स्पष्ट माहिती मागावी व जनमाहिती अधिकारी यांनी शुल्क भरुन घेऊन अपीलकर्त्यास माहिती द्यावी असा निर्णय त्यांनी प्रथम अपीलात दिनांक १७.३.२०११ रोजी दिलेला आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

... ४

५.	जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र मुद्या क्रमांक १ च्या संदर्भात ग्रामपंचायत कार्यालयाची रचना व मुद्या क्रमांक २ च्या संदर्भात ग्राम सचिवांचे अधिकार व कर्तव्याची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले.

६.	अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अपीलकर्त्याच्या दिनांक २९.१२.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक १ च्या संदर्भात ग्रामपंचायत कार्यालयाची रचना बाबत ग्रामपंचायतच्या संचालक मंडळाची यादी व कालावधी याची माहिती द्यावी. तसेच ग्रामसेवक यांचे जॉब चार्टची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

७.	**अपील क्रमांक ५२९/२०११** अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २४.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत दाभा (आगरगांव), ता. हिंगणा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक १.१.२००९ ते दिनांक २४.११.२०१० पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयाची रचना, ग्रामसेवकाचे अधिकार व कर्तव्याबद्दलची माहिती, आर्थिक योजनांच्या बाबतची माहिती, धोरण करणे संदर्भात व्यवस्थेची माहिती, इत्यादी बाबत माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे कडून दिनांक १०.१२.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहिती ही सुस्पष्ट नसल्याने कोणती माहिती द्यावी याबाबत संभ्रम झालेला आहे. म्हणून आपण ग्रामपंचायत कार्यालयात प्रत्यक्ष येऊन पाहिजे असलेली माहिती समजावून द्यावी असे कळविले. तथापी त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २७.१२.२०१० रोजी विस्तार अधिकारी, पंचायत समिती, हिंगणा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलात मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपात आहे म्हणून अपीलकर्त्याने पाहिजे असलेली माहिती सुस्पष्ट मागावी व माहितीचे शुल्क भरुन घेऊन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना प्राप्त झाला. परंतु त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... ५

८. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २४.११.२०१० चा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा बोध होत नसल्यामुळे अपीलकर्त्यास दिनांक १०.१२.२०१० रोजी पत्र लिहून असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीचा कोणताही बोध होत नाही म्हणून आपण प्रत्यक्ष ग्रामपंचायत कार्यालयात येऊन स्पष्टपणे माहिती मागावी व मागितलेली माहिती समजावून द्यावी . तथापी अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात आले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांनी सांगितले.

९. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची होती. म्हणून अपीलकर्त्याने त्यांना पाहिजे असलेली माहिती स्पष्टपणे जनमाहिती अधिकारी यांचेकडे मागावी व त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे शुल्क भरुन घेऊन त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय त्यांनी प्रथम अपीलात दिलेला होता.

१०. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने त्यांच्या माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येते. तथापी त्यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना ग्रामपंचायतकडे जी माहिती उपलब्ध असले ती माहिती त्यांना देण्यात यावी. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्यास ग्रामपंचायतच्या वार्षिक अहवालाची प्रत तसेच ग्रामपंचायत संचालक मंडळाची प्रत तसेच ग्रामपंचायतने राबविलेल्या वैयक्तिक लाभाची माहिती व ग्राम सचिवांचा जॉबचार्टची प्रत उपलब्ध आहे ती माहिती अपीलकर्त्याने शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. सदरची माहिती अपीलकर्त्याने शुल्क भरुन प्राप्त करण्याचे सुनावणीत मान्य केले म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

११. **अपील क्रमांक ५३०/२०११** अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ४.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, नागलवाडी, ता. हिंगणा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ग्रामपंचायत नागलवाडी संबंधात माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे

कडून दिनांक ३.४.२०११ ला आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यासंदर्भात त्यांचे समाधान झालेले आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात यावे असे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले. अपीलकर्त्याचे विनंती प्रमाणे अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

१२. **अपील क्रमांक ५३१/२०११** प्रस्तुत विषयाचे अपील यापुर्वी अपील क्रमांक १९५/२०११ मध्ये आयोगाने दिनांक ९.५.२०११ रोजी निर्णय निर्गमित केलेला आहे म्हणून प्रस्तुत प्रकरणात पुन्हा स्वतंत्र निर्णय देण्याची आवश्यकता नाही ही बाब अपीलकर्त्याने आयोगाचे निदर्शनास आणून दिली म्हणून सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

१३. **अपील क्रमांक ५३२/२०११** अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १२.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, टाकळघाट, ता. हिंगणा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन टाकळघाट ग्रामपंचायतच्या संदर्भात दिनांक १.१.२००९ ते दिनांक १२.११.२०१० पर्यंतच्या कालावधीतील माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, टाकळघाट यांचेकडून दिनांक ३०.११.२०१० च्या पत्राने माहितीचे शुल्क रुपये ३३०६/- भरण्याबाबत कळविले. तथापी सदरच्या माहितीचे शुल्क भरण्याचे पत्रात दिनांक २८.१०.२०१० चा अर्ज व दिनांक १२.११.२०१० चा अर्ज या दोन्ही अर्जाचा संदर्भ दिलेला आहे. तथापी त्यांनी दिनांक २८.१०.२०१० च्या अर्जात माहिती मागितलेली नाही. त्यांनी माहिती फक्त दिनांक १२.११.२०१० च्या अर्जात मागितलेली होती. तथापी दोन्ही अर्जाचे संदर्भ देऊन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहितीचे शुल्क रुपये ३३०६/- भरण्यास कळविले. म्हणून त्यांनी माहितीचे शुल्क भरले नाही. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

१४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, हिंगणा यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रुपये ३३०६/- भरण्याबाबत कळविले होते. मात्र अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून त्यांचे प्रथम अपील फेटाळले.

१५. अपीलकर्ता तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३०.११.२०१० च्या पत्राने माहितीचे शुल्क रुपये ३३०६/- भरण्याबाबत कळविले असून शोध फी रुपये २००/- त्यामध्ये कळविले आहे. तसेच माहितीचे शुल्क रुपये ३१०६/- मध्ये किती कागदपत्रे आहेत याचा तपशील दिलेला नाही. अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांना फक्त दिनांक १२.११.२०१० च्या अर्जात माहिती मागितलेली आहे. त्यांच्या दिनांक २८.१०.२०१० च्या अर्जात त्यांनी माहिती मागितलेली नाही. मात्र त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी या दोन्ही अर्जाचे माहितीचे शुल्क आकारुन कळविल्यामुळे माहितीचे शुल्क भरले नाही. वास्तविक पाहता जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क कळवितांना किती कागदपत्रे आहेत व त्याची रुपये २/- प्रमाणे किती फी होते याचा तपशील देणे आवश्यक होते. तशी कार्यवाही जनमाहिती अधिकारी यांनी केलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कागदपत्रे विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ५२८/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी अपीलकर्त्यास ग्रामपंचायत संचालक मंडळाची यादी व त्यांचा कालावधी व ग्रामसचिव यांचे जॉबचार्टची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ५२९/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ग्रामपंचायतच्या वार्षिक अहवालाची प्रत, ग्रामपंचायत संचालक मंडळाची प्रत, ग्रामपंचायतीने राबविलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनांची माहिती, ग्रामसेवकाचे जॉबचार्टची प्रत या मुद्यांची माहिती नियमाप्रमाणे माहितीचे शुल्क आकारुन हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहितीचे शुल्क भरुन घेऊन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

४) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ५३०/२०११ हे खारीज करण्यात येत आहे.

५) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ५३१/२०११ हे खारीज करण्यात येत आहे.

६) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ५३२/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ग्रामपंचायतीचा वार्षिक अहवालाची प्रत, ग्रामपंचायतीच्या संचालक मंडळाची यादी व त्यांचा कालावधी, ग्राम सचिवांचा जॉबजार्ट इत्यादी माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

७) आजच्या सुनावणीला ग्राम सचिव, ग्रामपंचायत, टाकळघाट हे मेडिकल रजेवर असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाही. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, हिंगणा यांनी वर नमुद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांचे कडून हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विनामुल्य माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावी.

८) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५३९/२०११.**

श्री. एस. झेड्. अहमद,
७०१, जिलानी हाऊस,
नमकगंज, इतवारी, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. शशीकांत एस. हस्तक,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जलप्रदाय विभाग,
बोले पेट्रोल पंपच्या मागे, धरमपेठ,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. एस. एम. नेरळ,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जलप्रदाय विभाग,
गांधीबाग झोन क्रमांक ६,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २७.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जलप्रदाय विभाग, गांधीबाग झोन क्र. ६, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे

... २

माहितीचा अर्ज सादर करुन इंडेक्स क्रमांक ३१ मधील ४ नळांच्या पाणी आकारणी थकबाकी संदर्भात व वसुली संदर्भात सन २००३ ते २०१० पर्यंत या कालावधीची त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २५.१०.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता, जलप्रदाय विभाग यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने इंडेक्स क्रमांक ३१ च्या संदर्भात एकूण ४ नळांच्या पाणी आकारणी थकबाकी बाबत व वसुलीबाबत सन २००३ ते २०१० पर्यंत माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती वर्ष निहाय काढण्यात आली व दिनांक २५.१०.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास सदरची माहिती उपलब्ध करुन दिली. जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २५.१०.२०१० च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र पाणी आकारणी थकबाकी वसुली संदर्भात केलेली कार्यवाहीची माहिती त्यांना मिळालेली नाही असे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ज्या नळधारकांकडे पाणी आकारणीची थकबाकी आहे त्यांना वसुली संदर्भात नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. म्हणून प्रस्तुत प्रकरणात थकबाकीचे वसुली बाबत ज्या नोटीसा दिलेलया आहेत त्या नोटीसाच्या छायाकिंत प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पाणी आकारणीची थकबाकी वसुलीच्या संदर्भात दिलेल्या वसुलीच्या नोटीसाच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिति आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिति आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिति आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५४१/२०११.

श्री. देवेंद्र एस. ब्राम्हणवाडे,
मु. पो. कनेरी, ता. जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा क्रिडा अधिकारी,
ता. जि. गडचिरोली.

श्री. अनिल चोरमडे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा क्रिडा अधिकारी,
ता. जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा क्रिडा अधिकारी, गडचिरोली यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २३.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २५.१०.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने शिवाजी शिक्षण प्रचारक मंडळ, गडचिरोली या संस्थेनी त्यांचे कार्यालयाकडे सन

... २

२००१ ते २०१० या वर्षात ज्या निधीचा मागणी प्रस्ताव सादर केला होता व त्यांचे कार्यालयाकडून दिलेले वितरीत करण्यात आलेले अनुदान निधीची माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही १० वर्षाची असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातील दस्तऐवजांमधून सदरची माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे एकूण पेजेस ५०५ असल्यामुळे प्रती पेज रुपये २/- प्रमाणे माहितीचे शुल्क रुपये १०१०/- भरण्याबाबत अपीलकर्त्यास दिनांक २२.११.२०१० च्या पत्राने कळविण्यात आले. सदरचे पत्र जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातून पोस्टाने अपीलकर्त्यास पाठविल्याबाबत जावक रजिस्टरचा पुरावा दाखविला. त्यावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २२.११.२०१० रोजी व दिनांक १५.१२.२०१० रोजी रजिस्टर पोस्टाद्वारे माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविलेले आहे. माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र जावक रजिस्टर मधील जावक क्रमांक ८१९ अन्वये पोस्टाद्वारे पाठविल्याचे दिसून येते. तथापी अपीलकर्त्याने माहिती शुल्काचा भरणा केला नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील देखील जनमाहिती अधिकारी यांचेकडेच दाखल केल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी हे उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नागपूर विभाग, नागपूर हे आहेत म्हणून त्यांचेकडे प्रथम अपील दाखल करावे असे देखील दिनांक १.१२.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्याचे आयोगाचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतरही अपीलकर्त्याने उपसंचालकाकडे प्रथम अपील दाखल केले नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा त्यांचे कडील माहिती अर्जाला अनुसरुन दिनांक २२.११.२०१० व दिनांक १५.१२.२०१० चे पत्र रजिस्टर पोस्टाद्वारे शुल्क भरण्याबाबत कळविले आहे. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केलेला नाही म्हणून अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे शुल्काचा भरणा करावा व अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्वरित माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५४२/२०११.**

श्री. देवेंद्र एस. ब्राम्हणवाडे,
मु. पो. कनेरी, ता. जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. के. दुपारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्या यांचा दिनांक १९.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २३.११.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गडचिरोली या शैक्षणिक संस्थेने भरतीसाठी दिलेल्या जाहिरातीची प्रत, रोस्टरची

... २

सत्यप्रत, जाहिरातीनुसार प्रत्यक्षात भरण्यात आलेली पदे, इत्यादी संदर्भात एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गडचिरोली यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी दिनांक २९.११.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहिती ही शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गडचिरोली यांचेशी संबंधित असल्याने सदरच्या माहितीसाठी शाळेचे मुख्याध्यापक हे जनमाहिती अधिकारी असल्याने त्यांचेकडून प्राप्त करुन ध्यावी. तथापी त्यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे दाखल करावे असे अपीलकर्त्यास कळवून त्या पत्राची प्रत जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, शिवाजी हायस्कूल तथा विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली यांचेकडे देखील पाठविण्यात आले व त्या पत्रात त्यांनी असे निर्देश दिले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यात यावी.

४. अपीलकर्त्याचे माहिती अर्जाला अनुसरुन शिवाजी हायस्कूल तथा विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली यांचे मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास दिनांक १०.१२.२०१० च्या पत्राने माहितीचे शुल्क रुपये १०/- भरण्याबाबत लेखी कळविले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्काचा भरणा केला नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे दिनांक २१.१२.२०१० रोजी दाखल केले व शिक्षणाधिकारी कार्यालयातून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा दिनांक २८.१२.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहिती प्राचार्य, शिवाजी हायस्कूल, गडचिरोली यांचेकड माहितीचे शुल्क रुपये १०/- जमा करुन माहिती घेऊन जावी असे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली कार्यालयातून अपीलकर्त्यास कळविल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. प्रस्तुत प्रकरणी शिक्षणाधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात प्राचार्य, शिवाजी हायस्कूल, गडचिरोली यांचेकडे माहितीचे शुल्क जमा करुन घेऊन त्यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, शिवाजी हायस्कूल, गडचिरोली यांचेकडे भरणा करावा व अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यानंतर प्राचार्य यांनी अपीलकर्त्यास त्वरित माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे प्राचार्य, शिवाजी हायस्कूल तथा उच्च माध्यमिक शाळा, गडचिरोली यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/६९८-७००/१८.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५५०/२०११.

श्री. अनील कुमार प्यारेलाल अग्रवाल,
बाजार लाईन, ता. देवरी, जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वि. सा. शिंदे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक,
भूमी अभिलेख, जि. गोंदिया.

श्री. बी. ओ. मोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअधिक्षक,
भुमी अभिलेख, ता. देवरी, जि. गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, देवरी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन तलाठी यांचेकडील फेरफार क्रमांक ३६० मधील अकृषक नोंदीचा दिनांक ९.२.१९९९ च्या तालुका भुमी अभिलेख, देवरी यांचे आदेशाची प्रत मागितलेली होती. तसेच गट नंबर ३३२ व ३४० च्या अभिलेखात अकृषक नोंद आहे किंवा नाही इत्यादी बाबतची माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १२.३.२०१० च्या

... २

पत्राने असे कळविले की, माजी सेवानिवृत्त निमतानदार यांच्या कालावधीत सदरची नोंद झालेली आहे. म्हणून त्यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे त्यांना कळविले. मात्र त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, गोंदिया यांचेकडे दिनांक ९.१०.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.१०.२०१० रोजी देण्यात आला व त्या निर्णयात असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मागणी केल्याप्रमाणे नक्कलांच्या प्रमाणित प्रती संबंधितास ३ दिवसांचे आंत विनामुल्य पुरवावी. तथापी त्यानंतरही अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने वर नमुद केल्याप्रमाणे माहिती मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याने दिनांक ९.२.१९९९ च्या अकृषक नोंदींच्या संदर्भात तालुका भुमी अभिलेख, देवरी यांचे आदेशाची प्रत मागितलेली होती. मात्र दिनांक ९.२.१९९९ च्या आदेशाची प्रत त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध झालेली दिसून आली नाही. म्हणून तत्कालीन निमतानदार श्री. बी. एम. मडावी यांना या संदर्भात पत्र देऊन त्यांचेकडून माहिती मागितली व त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देऊन अपीलकर्त्यास असे कळविले की, माजी सेवानिवृत्त निमतानदार यांचेकडून योग्य ती माहिती प्राप्त होताच आपणास माहिती कळविण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगसमोर सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, गोंदिया यांचेकडे दिनांक ९.१०.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी घेऊन दिनांक २५.१०.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला व त्या निर्णयामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत आयोगापुढे सांगितले.

५. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली दिनांक ९.२.१९९९ च्या आदेशाच्या प्रतीची उपलब्धतेबाबत त्यांचे कार्यालयात पुन्हा शोध घेतला. परंतु दिनांक ९.२.१९९९ च्या तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख यांचे हे आदेश प्राप्त झाले नाही म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २७.१०.२०१० च्या पत्राने सदरचे आदेश कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविले व गट क्रमांक ३३२ व ३४० या संबंधात नकाशाची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्यात आल्या. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख, देवरी यांचेकडील दिनांक ९.२.१९९९ च्या आदेशाची प्रत मिळालेली नाही. याबाबत विद्यमान जनमाहिती अधिकाराी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची दिनांक ९.२.१९९९ च्या आदेशाची प्रत त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध झालेली नाही म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ९.२.१९९९ च्या आदेशाची प्रत उपलब्ध होत नाही असे स्पष्टपणे कळविणे योग्य होईल.

६. तसेच अपीलकर्त्याने आयोगापुढे असे सांगितले की, फेरफार क्रमांक ३६० ची नोंद तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख, देवरी यांच्या दिनांक ९.२.१९९९ च्या आदेशाने घेण्याबाबतच्या नोंद फेरफार नोंदवही मध्ये घेतलेली आहे. सदरची नोंद ही चुकीची असून बेकायदेशीर आहे म्हणून ती नोंद रद्द करावी असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, चुकीच्या फेरफाराच्या नोंदी रद्द करावयाचे झाल्यास अपीलकर्त्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अंतर्गत त्यांचेकडे अपील दाखल करणे जरुरीचे आहे. कारण सदरची कार्यवाही ही वैधानिक स्वरुपाची आहे म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकत्याने जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, गोंदिया यांचेकडे फेरफार क्रमांक ३६० रद्द करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये अपील दाखल करुन दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलकर्त्यास तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख, देवरी यांचेकडील दिनांक ९.२.१९९९ च्या आदेशाची प्रत उपलब्ध होऊ शकत नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख, देवरी यांच्या दिनांक ९.२.१९९९ चे आदेश त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे विनामुल्य कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५५१/२०११.

श्री. अजित राजाराम भडके,
अध्यक्ष,
चंद्रपूर जिल्हा मागासवर्गीय नागरी सहकारी पत संस्था,
संजय नगर, मुल रोड, चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,
प्रशासकीय भवन, बस स्टॅन्ड समोर,
चंद्रपूर.

श्री. गौतम आडकुजी तोडे,
गोल्डी झेरॉक्स, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर,
रेल्वे स्टेशन रोड, ता.जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी यांचे तर्फे श्री. डी. एच. रोहणकर, मुख्य लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांचेकडील दिनांक ३१.१२.२०१० च्या प्रथम अपीलाच्या निर्णयातील आदेशाविरुध्द द्वितीय अपील दाखल

... २

केल्याचे नमुद केले. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी तपासणी न करता आदेश पारित केलेला आहे. सदरचे प्रथम अपील त्यांचेकडे मुदतीत दाखल केलेले नव्हते. परंतु जिल्हा उपनिबंधक यांनी याबाबतचा विचार न करता अपीलकत्याचे अपील हे अंशतः मंजूर केले आहे. त्या आदेशाविरुध्द त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असून हा आदेश रद्द बातल ठरवावा असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

३. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे प्रतिनिधींनी आयोगापुढे सांगितले की, जिल्हा उपनिबंधकाकडील अपील क्रमांक ३/१० मध्ये दिनांक ३१.१२.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय झालेला असून सदरचा निर्णय हा नियमानुसार देण्यात आलेला आहे व अपीलकर्त्याला संस्थेकडे माहितीचे शुल्क भरणा करण्याबाबत आदेश दिलेले आहेत व अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यानंतर संस्थेने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले आहे असे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. त्याचप्रमाणे त्यांनी आयोगापुढे असे देखील सांगितले की, प्रस्तुत प्रकरणी राज्य माहिती आयोगाकडे अपीलकर्ता श्री. गौतम आडकूजी तोडे यांनी अपील क्रमांक ६३/२०११ आयोगाकडे दाखल करुन या अपीलाचा निर्णय आयोगाने दिनांक ६.४.२०११ रोजी निर्गमित केला आहे व त्या निर्णयामध्ये देखील अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करुन अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर संस्थेंने माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला आहे.

५. अपीलकर्ता, तसेच उत्तरवादी यांचेवतीने उपस्थित असलेले प्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी दिनांक ३१.१२.२०१० रोजी निर्गमित केलेला प्रथम अपीलाचा आदेश योग्य असल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लक्षात घेता सार्वजनिक प्राधिकारणाने नागरिकांना त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. म्हणून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी दिनांक ३१.१२.२०१० रोजी दिलेला प्रथम अपीलाचे निर्णयात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येते.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५४८/२०११.**

श्री. शांतिलाल राजाराम दखने,
भगवती कृपा निवास, गोविंदपूर रोड,
सिव्हील लाईन, ता. जि. गोंदिया - ४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. जि. गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा,
तहसीलदार,
ता. जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी यांचे तर्फे श्री. एम. एल. बारस्कर, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. मात्र उत्तरवादी यांचे प्रतिनिधीने आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहिती अर्जात तालुका स्तरीय

... २

शासकीय समित्यांची संख्या, नावे, शासन निर्णय/परिपत्रकाद्वारे स्थापन झाली तो क्रमांक, दिनांक व विभागाचे नांव, तपशीलासह तसेच अध्यक्ष व सचिवांची पदनामासह नावे इत्यादी माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन तहसीलदार, गोंदिया यांनी दिनांक ३.३.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की, आपल्या माहिती अर्जान्वये आपण गोंदिया तालुक्यातील तालुका स्तरीय शासकीय समित्यांचे पदाधिकारी, समित्यांची संख्या, समिती स्थापनेचा दिनांक, अध्यक्ष व सचिवांची पदनाम याबाबतची माहिती माहितीचा अधिकार २००५ अन्वये मागितलेली आहे. तथापी आपणास कोणत्या शासकीय समितीची माहिती पाहिजे याचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. तसेच शासकीय समित्यांची स्थापना या कार्यालयाद्वारे केल्या जात नाही. त्यामुळे सदर माहिती आपणास या कार्यालयाद्वारे देता येणे शक्य नाही असे अपीलकर्त्यास कळविण्यात आले. त्यानंतर अपीलकर्त्याने तहसीलदार, गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दिनांक १०.३.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १८.३.२०११ रोजी घेण्यात आली. त्या सुनावणीत अपीलकर्ता हजर होते व सुनावणीमध्ये अपीलकर्त्याने असे सांगितले की, तहसील स्तरावरील ज्या समितीचे सचिव तहसीलदार आहेत व ते सभा घेतात त्यांची माहिती त्यांना पाहिजे आहे असे त्यांनी प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी सांगितले. त्यावेळेला तहसील कार्यालयात उपलब्ध असलेल्या समित्यांची माहिती त्यांना देण्यासाठी तयार करण्यात आली. परंतु त्यांनी ती घेण्यास नकार दिला व आदेशासह पाठवावी असे प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी नमुद केले. त्यामुळे जिवनावश्यक वस्तुवर देखरेख ठेवण्यासाठी नगर परिषद दक्षता समिती व संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना समिती मा. जिल्हाधिकारी, गोंदिया कडून प्राप्त यादी प्रथम अपीलाचे आदेशा सोबत दिनांक ५.४.२०११ च्या पत्राने पाठविण्यात आली व सदरची माहिती अपीलकर्त्यास दिनांक १५.४.२०११ रोजी प्राप्त झाल्याची पोच आयोगासमोर दाखविण्यात आली.

४. यावरुन अपीलकर्त्यास तहसीलदार, गोंदिया यांचेकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५५७/२०११.**

श्री. अनिल दादाजी भांडेकर,
मु. पो. लांजेडा, ता. जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ निम्म श्रेणी तथा
मुद्रांक जिल्हाधिकारी, ता. जि. गडचिरोंली.

श्री. ताज मोहम्मद एम हनीफ,
जनमाहिती अधिकारी तथा,
दुय्यम निबंधक,
विवाह निबंधक कार्यालय, ता.जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणत्याही प्रकारची म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २८.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या अर्जात एप्रिल २००९

... २

ते डिसेंबर २०१० या कालावधीत बिगर एन.ए.चे विक्री झालेले प्लॉटचे विवरण व महाराष्ट्र शासनाचे विक्रीचे परिपत्रक देण्यात यावे अशी माहिती मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा स्पष्टपणे बोध होत नसल्यामुळे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.१२.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपणास जी माहिती हवी आहे ती माहिती दैनिक पुस्तकात मिळू शकते. कृपया नोंदणी नियमावली अनु. १०(३) अंतर्गत प्रत्येक मालमत्तेच्या प्रत्येक दस्ताऐवजा संबंधातील नोंदवहीसाठी प्रत्येक नोंदीसाठी रुपये २५/- इतके रोखीने भरुन पाहणी करता येईल. त्यानंतर जितके नकला पाहिजे असेल तितक्या नकलास प्रती पाने रुपये २०/- प्रमाणे फी भरुन नकला घेता येईल. तथापी अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात माहितीचे शुल्काचा भरणा करण्यासाठी हजर झाले नाही म्हणून त्यांना माहिती देता आली नाही. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सह जिल्हा निबंधक वर्ग-१, गडचिरोली यांचेकडे दिनांक १५.२.२०११ रोजी दाखल केले. त्या पदाचा पदभार देखील जनमाहिती अधिकारी यांचेकडे असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २८.२.२०११ रोजी ठेवली होती. त्या दिवशी अपीलकर्ता सुनावणीस हजर झाले व त्यांनी प्रथम अपीलाचे सुनावणीत त्यांना पाहिजे असलेल्या माहितीची विचारणा करण्यात आली असता त्यांना एप्रिल २००९ ते डिसेंबर २०१० या कालावधीत बिगर एन.ए. विक्री झालेल्या प्लॉटची माहिती पाहिजे असे त्यांनी सांगितले. म्हणून त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात या कालावधीत श्री. विजय पांडुरंग पुंड यांच्या बिगर एन.ए. प्लॉटची विक्री बाबतची इंडेक्सची प्रत, कागदपत्रे देण्यात आली व त्यासोबत महाराष्ट्र नोंदणी नियमावली १९६१ चे कलम ४४ ची प्रत म्हणजे नोंदीसाठी दस्ताऐवज स्विकारण्यापूर्वी विवक्षित अशा आवश्यक गोष्टीची फेरतपासणी करणे याबाबत माहिती दिनांक ८.३.२०११ रोजी अपीलकर्त्यास देण्यात आली. त्याबाबतची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली.

४. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ८.३.२०११ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७११-७१३/२०.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५५६/२०११.

श्री. किशोर तुकाराम बन्सोड,
मु. पो. बोंडगांव/देवी, ता. अर्जुनी/मोर,
जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आसाराम विठोबा सेलोकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव, ग्राम विकास शिक्षण संस्था, खुनारी,
पो. कोलारी (पटाची) ता. लाखनी, जि. भंडारा.

श्री. बी. ए. खोटेले,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापक,
स्वामी विवेकानंद विद्यालय, खराशी,
ता. लाखनी, जि. भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.७.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने ॲड. वैभव पत्रे, हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने ॲड. ए. आर. इंगोले, हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

... २

३. जनमाहिती अधिकारी यांचे वकीलांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २८.१०.२०१० चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद विद्यालय, खराशी यांचे सबंधात एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्याच प्रकारची माहिती अपीलकर्त्याने यापुर्वी दिनांक ८.१०.२०१० च्या पत्राने देखील जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे मागितलेली होती. दिनांक ८.१०.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन यापुर्वी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे अपीलकर्त्याने अपील क्रमांक १७७५/२०१० दाखल केले होते. त्या अपीलाचा निर्णय दिनांक २३.३.२०११ रोजी देण्यात आला आहे व त्या निर्णयानुसार कार्यवाही झालेली असून अपीलकर्त्यास दिनांक १०.२.१०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे वकीलांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून सदरचे अपील खारीज करावे असे वकीलांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वकीलांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी उपलब्ध करुन दिली असल्याने व या संस्थेच्या Change Report संदर्भात न्यायालयात प्रकरण सुरु असल्याने प्रथम अपीलाचा निर्णय त्यांनी दिलेला नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वकीलांनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वकीलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने दिनांक २८.१०.२०१० च्या मागितलेल्या माहितीचे अर्जातील माहिती व राज्य माहिती आयोगाकडील अपील क्रमांक १७७५/२०१० आदेश पारित दिनांक २३.३.२०११ मधील माहितीचे स्वरुप हे सारखेच असल्यामुळे त्या माहितीबाबत दिनांक २३.३.२०११ रोजी आदेश पारित केले असल्यामुळे पुन्हा आदेश पारित करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७१४-७१६/२०.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५५९/२०११.

श्री. ईश्वर तुळशीराम अमृतकर,
मु. पो. नागभीड वार्ड नं. ३, भगतसिंग चौक,
ता. नागभिड, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. बी. बोकाडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सिंचाई विभाग,
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. रमेश तुकडोजी वाघमारे,
जनमाहिती अधिकारी तथा,
स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक,
लघु सिंचाई, जिल्हा परिषद उपविभाग,
ता. नागभिड, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १२.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघु सिंचन उपविभाग, जिल्हा परिषद, नागभिड यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन गट नंबर १७३ आ. २.१० हे.आर. शेतजमीनीस जाणुनबुजून हेतुपुरस्कृत लाचलुचपत न दिल्यामुळे अर्जदार

... २

चुकीचे ना हरकत प्रमाणपत्र दिल्याबाबत एकूण ८ मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे दिनांक ६.१२.२०१० रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १२.४.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे संदर्भात अपीलकर्त्यास दिनांक २१.४.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये असे नमुद केले की, आपण माहिती अधिकारान्वये मागितलेली माहिती यापुर्वीच या कार्यालयाने दिनांक ३.२.२०१० च्या पत्राने परिपुर्ण माहिती आपणास देण्यात आलेली आहे. तसेच पुन्हा तिच माहिती दिनांक ३.४.२०१० च्या पत्राने देखील आपणास दिलेली आहे. तसेच आपल्या माहितीच्या अर्जानुसार २ लक्ष रुपयांचे नुकसान भरपाई देणे या कार्यालयास शक्य नाही असे अपीलकर्त्यास कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व त्या सुनावणीमध्ये असा निर्णय दिला की, अपीलकर्त्याचे शेतात गट नं. १७३ आ. २.१० हे.आर. शेताला तलावापासून ओलीताचा हक्क लागू करण्याबाबत त्यांच्या शेताचा ७/१२ वर निस्तार अधिकाराची नोंद घेण्याची कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आला. त्याला अनुसरुन कार्यकारी अभियंता यांनी दिनांक १६.२.२०११ च्या पत्राने उपविभागीय अधिकारी, महसूल विभाग, ब्रम्हपूरी यांचेकडे पत्र पाठवून अपीलकर्त्याचे शेतात गट क्रमांक १७३ आराजी २.१० हे. आर. शेताच्या ७/१२ उताऱ्यावर निस्तार हक्काबाबतची कार्यवाही करावी असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविल्याचे सुनावणीत सांगितले.

५. तथापी याबाबत अपीलकर्त्यांचे असे म्हणणे आहे की, जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून त्यांच्या ७/१२ च्या उताऱ्यावरती निस्तार हक्काबाबतची नोंद घेण्याच्या कार्यवाहीस विलंब झाल्यामुळे त्यांचे

नुकसान झाले. परंतु याबाबत जनमाहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता यांचे असे म्हणणे आहे की, सदरच्या शेतकऱ्याचा ७/१२ वर निस्तार हक्काबाबतची नोंद घेण्याची कार्यवाही ही महसूल विभागाशी संबंधित आहे व वेळोवेळी अपीलकर्त्यास त्याबाबत प्रत्यक्ष सांगितले देखील आहे. मात्र अपीलकर्त्याचे याबाबत असे म्हणणे आहे की, त्यांच्या माहिती अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ज्या मुद्यांची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध नाही त्याची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक १२.४.२०१० च्या माहिती अर्जातील ८ मुद्यांबाबतची वस्तुस्थिती विनामुल्य कळवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७१७-७१९/२०.७.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५६६/२०११.

श्री. देवेंद्र विजयकुमार गहेरवार,
किल्ला वार्ड, गुरुदेव चौक,
ता. तिरोडा, जि. गोंदिया - ४४१ ९११. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. जी. पी. येरणे,
जनमाहिती अधिकारी तथा,
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. ओ. बी. गुढे, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ७.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री. आर. पी. देशपांडे, तत्कालीन उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांच्या कार्यकाळात म्हणजे सन २००३ यावर्षात ते उपशिक्षणाधिकारी असतांना त्यांनी श्री. पी. एन. शर्मा, आर. एस. जी. के. हायस्कूल, तुमसर यांचे विरुध्द झालेल्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी केली होती. त्या चौकशी अहवालाची प्रत व त्यासोबतचे दस्तऐवज त्यांनी मागितलेले होते. त्यांना चौकशी संदर्भात काही दस्तऐवज मिळाले. मात्र चौकशी अहवालाची प्रत त्यांना मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा दिनांक ७.१.२०११ चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतु या अर्जाचे संदर्भात ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास त्याना माहिती देता येणे शक्य झाले नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे दिनांक १४.२.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे नंतर दिनांक ५.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीचा शोध घेतला असता सदरची माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. त्यानंतर या माहितीच्या संदर्भात त्यांनी शाळेचे मुख्याध्यापकाकडून या संदर्भातील कागदपत्रे मागितली. सदरची कागदपत्रे शाळेचे मुख्याध्यापकाकडून प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास दिनांक २४.६.२०११ रोजी १२ पेजेसची माहिती दिली. तथापी त्यांना चौकशीच्या अहवालाची प्रत मिळाली नाही असे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने उपस्थित झालेले प्रतिनिधी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे दिनांक १४.२.२०११ रोजी दाखल झाले होते. मात्र त्या अपीलाचा निर्णय दिलेला नाही.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले प्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक ७.१.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर दिनांक ५.३.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध नाही असे विलंबाने कळविले. तसेच मुख्याध्यापकाकडून कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर ते अपीलकर्त्यास दिनांक २४.६.२०११ रोजी उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत जनमाहिती अधिकारी यांनी काही कळविले नाही किंवा माहिती देखील उपलब्ध करुन दिली नाही. या विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी यांना खुलसास विचारला अतसा त्यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे अनेक अर्ज असल्यामुळे दिनांक ७.१.२०११ च्या अर्जावर ३० दिवसांचे मुदतीत कार्यवाही करता आली नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा मान्य करण्यासारखा नाही म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी हे विलंबास जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- ची शास्ती त्यांचेवर लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

३) सदरच्या शास्तीची रक्कम वसुल करण्याची कार्यवाही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिशद, भंडारा यांनी करावयाची आहे.

४) अपीलकर्त्याचे प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिलेला दिसून येत नाही. म्हणून याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी )माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांनी सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी भविष्यात याबाबीची पुनर्रावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७२०-७२२/२६.७.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५६९/२०११.

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड, ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वनसंरक्षक (मानव संसाधन विकास)
प्रधान मुख्य वनसंरक्षक, वनभवन,
सिव्हिल लाईन, नागपूर.

श्री. डी. के. तवाडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्य लेखापाल, कक्ष ७ (अ)
प्रधान मुख्य वनसंरक्षक, वनभवन,
सिव्हिल लाईन, नागपूर.

श्री. एस. पी. धुमाळ,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक (वन शिक्षण वनवृत्त),
नवीन पी. एम. टी. इमारत, तिसरा माळा,
स्वार गेट, पुणे - ४११ ०४२.

श्री. आर. व्ही. गोसावी,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक (कक्ष-५),
वन संरक्षक (वन शिक्षण वनवृत्त),
नवीन पी. एम. टी. इमारत, तिसरा माळा,
स्वार गेट, पुणे - ४११ ०४२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना

... २

आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक, नागपूर यांचेतर्फे श्री. ए. के. पथे, वनक्षेत्रपाल हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी, पुणे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २०.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल कक्ष क्रमांक ७(अ), प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन वन विभागात जून १९९५ मध्ये लिपिक/लेखापाल यांच्या विभागीय परिक्षा घेण्यात आल्या होत्या. त्या परिक्षेला ६०२ कर्मचारी बसले होते. त्यापैकी ३८४ कर्मचारी पास झाले. पास झालेल्या ३८४ कर्मचाऱ्यांच्या उत्तर पत्रिकेच्या झेरॉक्स प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. तसेच उत्तरपत्रिका नष्ट केल्या असल्यास त्याबाबत व इतर मुद्यांबाबत एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २०.२.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपील फेटाळले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २०.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २५.१.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही वन विभागात जून १९९५ मध्ये लिपिक/लेखापाल यांच्या घेण्यात आलेल्या विभागीय परीक्षेची होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात कक्ष अधिकारी-१ प्रशिक्षण तथा सहाय्यक वनसंरक्षक (विभागीय परिक्षा), पुणे यांचेकडे अपीलकर्ता यांचा अर्ज माहिती पुरविण्यासाठी पाठविण्यात आला. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा वनसंरक्षक (वन शिक्षण वृत्त) पुणे यांनी त्यांचे कडील दिनांक ९.२.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील एकूण ५ मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांचे अपेक्षेप्रमाणे त्यांना माहिती मिळालेली नाही असे त्यांनी नमुद केले.

४. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, वन विभागात जून १९९५ मध्ये झालेल्या विभागीय परिक्षेचा निकाल मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र वानिकी प्रकल्प समन्वय घटक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १२.१०.१९९५ अन्वये घोषित केलेला होता. त्यानंतर सन २००० मध्ये मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र वानिकी प्रकल्प समन्वय घटक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय बंद करण्यात आले. त्या कार्यालयाकडून सन १९९५ मध्ये घोषित केलेल्या विभागीय परिक्षेच्या संदर्भात कोणतेही दस्तऐवज त्यांचे कार्यालयात प्राप्त झाले नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेली एकूण ५ मुद्यांबाबतची वस्तुस्थिती कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ९.२.२०११ च्या पत्राने त्यांच्या माहिती अर्जातील एकूण ५ मुद्यांला अनुसरुन आवश्यक ती वस्तुस्थिती कळविलेली दिसून येते. तथापी मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र वानिकी प्रकल्प समन्वय घटक, महाराष्ट्र राज्य, पुणे हे कार्यालय सन २००० पासून बंद झालेले असल्यामुळे सन १९९५ मध्ये झालेल्या लिपिक/लेखापाल यांच्या विभागीय परिक्षेच्या संदर्भातील कोणतेही दस्तऐवज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र वानिकी प्रकल्प समन्वय घटक, महाराष्ट्र राज्य, पुणे हे कार्यालय सन २००० मध्ये बंद झाल्यानंतर लिपिक/लेखापाल यांच्या जून १९९५ मध्ये झालेल्या विभागीय परिक्षेच्या संदर्भात कोणतेही दस्तऐवज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही. त्यामुळे ते उपलब्ध करुन देता येत नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७२३-७२५/२६.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५७०/२०११.

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड, ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. आर. डी. त्रिभुवन,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक (संशोधन)
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
ता. जि. गडचिरोली.

श्री. अशोक मा. वाहाणे,
जनमाहिती अधिकारी तथा,
संशोधन अधिकारी,
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
ता. जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३१.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, गडचिरोली यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री. अशोक वाहणे, संशोधन अधिकारी आणि श्रीमती वसुधा नाईक, उपसंचालक यांनी दिनांक

... २

३०.१२.२०१० ला राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडील अपील क्रमांक १५३१/२०१० च्या सुनावणीमध्ये असे सांगितले की, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर कार्यालयाने गडचिरोली कार्यालयाकडे सुमारे ५०००० नस्त्या हस्तांतर केलेल्या आहेत. त्या ५०००० नस्त्यांची यादी त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसंचालक (संशोधन) यांचेकडे दिनांक २४.२.२०११ रोजी दाखल केले. मात्र उपसंचालकांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३१.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ५.२.२०११ रोजी प्राप्त झाला होता. वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्याने माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २१.२.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास अशी माहिती उपलब्ध करुन दिली की, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली कडे प्राप्त नस्त्यांची नोंदणी संगणकामध्ये करण्याचे काम सध्या सुरु आहे. आज तारखेपावेतो १३२४७ नस्त्यांची नोंदणी झालेली असून त्यांची यादी www.trti.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच आपण माहितीच्या अधिकारांतर्गत मागितलेली माहिती ही अतिशय प्रचंड असून त्या माहिती करिता प्राप्त नस्त्यांचे संस्करण करुनच ती माहिती आपल्याला द्यावी लागेल व तसे करणे हे माहितीच्या अधिकारात अभिप्रेत नाही. तसेच आपण मागितलेली माहिती ही मोठया प्रमाणावर असल्यामुळे ती देण्याकरिता या कार्यालयाची साधनसामुग्री ही प्रमाणाबाहेर वळवावी लागेल. तसेच समितीचे कामकाज हे अर्धन्यायीक स्वरुपाचे असल्यामुळे त्याचा दैनंदिन कामकाजावरसुध्दा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मागणी केलेली ५०००० नस्त्यांची यादी देणे शक्य होत नाही. तथापी समिती कार्यालयातील उपलब्ध अभिलेख सुरक्षित व व्यवस्थित ठेवण्याच्या अटीवर व हमीवर आपण कार्यालयात प्रत्यक्ष येऊन माहितीचे निरिक्षण करुन घेता येईल किंवा संगणकामध्ये नोंदणी झालेलया नस्त्यांची यादी नियमानुसार विहित शुल्क घेऊन आपल्याला देता येईल असे अपीलकर्त्यास त्यांनी कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने उपसंचालक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे नमुद केले व प्रथम अपील खारीज केल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २१.२.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असून अपीलकर्त्यास संकेतस्थळाचा क्रमांक देखील उपलब्ध करुन दिलेला आहे. म्हणून अपीलकर्त्याने या संकेतस्थळावरुन त्यांनी मागणी केलेल्या नस्तीची यादी त्यांना उपलब्ध करुन घेता येणे शक्य आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत दिलेला निर्णय योग्य असल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७२६-७२८/२६.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५७३/२०११.

श्री. रियाज रमजान शेख,
मॅमून चेंबर गांधीबाग,
सी. ए. रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती सुनिता अलोनी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

श्री. एस. बी. झाडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
संहाय्यक अभियंता, (मेट्रो)
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.७.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २७.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २८.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १.२.२०११ रोजी प्रत्यक्ष प्राप्त झाला. अपीलकर्त्याने सदरच्या माहिती

अर्जात मौजा लिंगा, प.ह.नं. ५१, खसरा नं. ६ या कृषक जमीनीचा उपयोग अकृषक वापरासाठी जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालयाकडून शेख असगर अली हसन अली मैमून चेरिटेबल ट्रस्टला शैक्षणिक वापरासाठी परवानगी मिळणे संर्दीाात ले आऊट मंजूरीसाठी जिल्हाधिकारी, नागपूर कडून प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्या प्रस्तावाबाबत माहिती अपीलकर्त्याने मागितलेली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १७.२.२०११ रोजी असे कळविले की, आपल्या अर्जाच्या अनुषंगाने खसरा क्रमांक ६, मौजा लिंगा या जागवरील मा. जिल्हाधिकारी यांच्यातर्फे प्राप्त प्रकरणात शैक्षणिक वापरासाठी मंजूरीची स्थितीबाबत सविस्तर माहिती मागितलेली आहे. त्यासाठी कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित होऊन धारीकेचे अवलोकन करुन माहिती संकलित करावी असे अपीलकर्त्यास जनमाहिती यांनी कळविले होते. तथापी अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात धारीकेचे निरिक्षण करण्यासाठी व माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी हजर झाले नाही. त्यामुळे त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता आली नाही.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहाय्यक संचालक, नगर रचना, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे दिनांक ३.३.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १७.३.२०११ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपीलकर्ता हे स्वतः हजर होते व प्रथम अपीलाचे सुनावणीत अपीलकर्त्यास सदरच्या प्रस्तावाचा अभिलेख अवलोकन करण्यास अपीलकर्त्यास अनुमती देण्यात आली व अपीलकर्त्याने दस्तऐवजाची मागणी केल्यास शुल्क आकारणीसह दस्तऐवज पुरविण्यात यावे असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २२.३.२०११ रोजी दिला. मात्र त्यानंतरही अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात या विषयीचा अभिलेख अवलोकन करण्यासाठी उपस्थित झाले नाही किंवा त्यांनी त्यामधील कोणत्याही दस्तऐवजाची मागणी हजर राहून केलेली नाही असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

५. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून शैक्षणिक वापरासाठी मंजूरी देण्याचे संदर्भात सदरच्या खसऱ्याच्या ले आऊटला मंजूरी देण्याचे संबंधात त्यांचे अभिप्राय मागितलेले आहेत. मात्र सदरच्या प्रकरणात असे दिसून येते की, सदरचा

खसऱ्यातील जमीनीचा उपयोग हा शासनाद्वारे मंजूर झालेल्या प्रादेशिक योजनेत फलोत्पादन करिता नियोजित असल्याने यामध्ये शैक्षणिक वापरासाठी अनुज्ञेय होईल अगर कसे याबाबत संचालक, नगर रचना, पुणे तसेच शासनाकडे मार्गदर्शन मागविले आहे व त्यांचेकडून मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

६. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी शासनाकडे व संचालक, नगर रचना, पुणे यांचेकडे मार्गदर्शन मागितलेले आहे व ते मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे सदरच्या प्रकरणाची वस्तुस्थिती विनामुल्य पोस्टाने कळवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७२९-७३१/२७.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४५/२०११.

श्री. प्रशांत पुंडलिकराव भेंडे,
संत ज्ञानेश्वर वार्ड (रिठे कॉलनी),
घोडे सर यांचे घरी, लक्ष्मी मंगल कार्यालयाचे मागे,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
हिंगणघाट, जि. वर्धा.

श्री. एस. एम. दांडेकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
नायब तहसीलदार,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.७.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २७.७.२०११ रोजी ठेवण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने या अर्जात तहसीलदार, हिंगणघाट यांचे कोर्टातील राजस्व मामला क्रमांक ३/एलएनडी/३०/०८-०९ आदेश पारित दिनांक ५.१.२००९ च्या

... २

संदर्भात एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २२.१२.२०१० च्या पत्राने एकूण ३ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. सदरची माहिती अपीलकर्त्यास दिनांक २३.१२.२०१० रोजी प्राप्त झाल्याची पोच त्यांनी आयोगापुढे दाखविली. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसीलदार, हिंगणघाट यांचेकडे दिनांक १२.१.२०११ रोजी दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २८.१.२०११ रोजी घेण्यात आली. तथापी प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर होते. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे प्रथम अपील खारीज करण्यात आलेले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.११.२०१० चा माहिती अर्जात मागितलेली काही माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची दिसून येते. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २२.१२.२०१० च्या पत्राने त्यांचेकडे उपलब्ध असलेली मुद्या क्रमांक २ ची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मुद्या क्रमांक १ व ३ ही प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती असल्यामुळे प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देणे अपेक्षित नाही. तथापी मुद्या क्रमांक २ ची उपलब्ध माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७३२-७३३/२७.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४४/२०११.

श्री. प्रशांत पुंडलिकराव भेंडे,
संत ज्ञानेश्वर वार्ड (रिठे कॉलनी),
घोडे सर यांचे घरी, लक्ष्मी मंगल कार्यालयाचे मागे,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
हिंगणघाट, जि. वर्धा.

श्री. एस. एम. दांडेकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
नायब तहसीलदार,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २७.७.२०११ रोजी ठेवण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ९.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने त्या अर्जात तहसीलदार, हिंगणघाट यांचेकडे दिनांक २३.९.२०१० रोजी सादर केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात

... २

एकूण ३ मुद्यांची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १०.१२.२०१० च्या पत्राने ३ मुद्यांची सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले व सदरची माहिती अपीलकर्त्यास दिनांक १६.१२.२०१० रोजी प्राप्त झाल्याची पोच त्यांनी आयोगापुढे दाखविली.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसीलदार, हिंगणघाट यांचेकडे दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ५.१.२०११ रोजी घेण्यात आली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हे उपस्थित होते. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील दिनांक ५.१.२०११ रोजी खारीज करण्यात आले असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दिनांक ९.११.२०१० च्या माहिती अर्जातील माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १०.१२.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असून सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच त्यांनी आयोगापुढे दाखविली म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७३४-७३५/२७.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४६/२०११.**

श्री. प्रशांत पुंडलिकराव भेंडे,
संत ज्ञानेश्वर वार्ड (रिठे कॉलनी),
घोडे सर यांचे घरी, लक्ष्मी मंगल कार्यालयाचे मागे,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
हिंगणघाट, जि. वर्धा.

श्री. एस. एम. दांडेकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
नायब तहसीलदार,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक २७.७.२०११ रोजी ठेवण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ९.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या माहिती अर्जात अपीलकर्त्याने तहसीलदार, हिंगणघाट यांच्या कोर्टातील रस्त्याच्या प्रकरणातील माहिती तसेच आदेश पारित प्रकरणाची माहिती व नायब तहसीलदार कोर्टातील प्रकरणाची माहिती व आदेश प्रकरणाची माहिती इत्यादी माहिती त्यांनी

... २

मागितलेली होती. त्या माहितीला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १०.१२.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सदरची माहिती प्राप्त झाल्याची पोच त्यांनी आयोगापुढे दाखविली.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसीलदार, हिंगणघाट यांचेकडे दाखल केले. या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ५.१.२०११ रोजी घेण्यात आली त्यावेळी अपीलकर्ता हे हजर होते. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १०.१२.२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असून अपीलकर्त्याचे प्रथम अपील दिनांक ५.१.२०११ रोजी आदेश पारित करुन खारीज केले असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास दिनांक ९.१०.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १०.१२.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७३६-७३७/२७.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५७८/२०११.

श्री. सतिश उध्दवराव नगराळे,
हिंदनगर, गणेश मंदीर चौक,
ता. जि. वर्धा - ४४२ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा.

श्री. यु. एन. ढोकणे,
जनमाहिती अधिकारी तथा,
तलाठी, नाचणगांव,
ता. देवळी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.७.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. राजेश सरवदे, नायब तहसीलदार, ता. देवळी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २४.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, नाचणगांव, ता. देवळी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन त्यांनी दिनांक १८.३.२०१० रोजी फेरफारकरिता अर्ज दिला आहे. त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती.

... २

तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील नायब तहसीलदार, पुलगांव यांचेकडे दिनांक २८.१२.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १०.१.२०११ रोजी घेण्यात आली. त्यावेळी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २४.११.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या अर्जात खरेदी केलेल्या शेत सर्व्हे नं. ४२५ संदर्भात फेरफारबाबत माहिती मागितलेली होती. सदरची माहिती तयार करण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक २२.१२.२०१० च्या पत्राने यु.पी.सी.द्वारे पत्र पाठवून असे कळविले की, आपण फेरफारबाबत केलेल्या अर्जाच्या संबंधात फेरफार क्रमांक ६४४२ अन्वये दिनांक १८.३.२०१० ला फेरफार पंजीत नोंद घेण्यात आली व दोन्ही पार्टीला सदर प्रकरणाबद्यल नमुना ६ नोटीस तामील केला असता श्री. तिवस्कर यांनी नोटीस घेण्यास नकार दिला. दिनांक १२.४.२०१० ला सदर प्रकरण मंजूरीकरिता मंडळ अधिकारी, पुलगांव यांचे समोर ठेवले असता त्यांनी नमुना ९ नोटीस तामील करुन पुढे ठेवा असा शेरा दिला. त्यानंतर श्री. तिवसकर यांना नोटीस तामील केला असता त्यांनी सदर फेरफारबाबत आक्षेप घेतला. म्हणून सदर प्रकरण विवादास्पद प्रकरण नोंदवहीत नोंदविण्यात आले असून नायब तहसीलदार, पुलगांव यांचे कार्यालयात निकालासाठी पाठविण्यात आले. अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. सदरचे दिनांक २२.१२.२०१० चे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने आयोगा समोर सांगितले. मात्र सदरचे दिनांक २२.१२.२०१० चे पत्र अपीलकर्त्यास यु.पी.सी. पोस्टाद्वारे पाठविल्याचा पोस्टाचा पुरावा तलाठी यांनी आयोगासमोर दाखविला. त्यावरुन सदरचे पत्र पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास पाठविल्याचे दिसून येते. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील नायब तहसीलदार, पुलगांव यांच्याकडे दिनांक २८.१२.२०१० रोजी दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १०.१.२०११ रोजी घेण्यात आली. सुनावणीचे वेळी अपीलकर्त्यांस प्रथम अपीलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार, पुलगांव यांचे समक्ष जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्त्यास फेरफार नक्कल, वादविवाद पंजीची नोंदवही, नमुना ९ ची नोटीस इत्यादी एकूण १९ पेजेसची माहिती देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले.

... ३

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २२.१२.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १०.१.२०११ रोजी झाली त्या दिवशी नायब तहसीलदार यांचे समक्ष पुन्हा वर नमुद केलेल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्याचे फेरफार संदर्भात वाद असल्यामुळे सदरचे प्रकरण विवादग्रस्त आहे म्हणून सदरच्या प्रकरणावर तहसीलदार, देवळी यांचे कार्यालयाकडे कार्यवाही सुरु आहे त्या संदर्भात तहसीलदार, देवळी यांचेकडून अपीलकर्त्यास व इतर यांना वादग्रस्त फेरफारासंबंधी सुनावणी घेण्याची कार्यवाही सुरु आहे. या वादग्रस्त फेरफार संबंधात तहसीलदार, देवळी यांचेकडून निर्णय झाल्यानंतर त्या निर्णयाप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात कार्यवाही करण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून याबाबत अपीलकर्त्याने तहसीलदार, देवळी यांचेकडे वादग्रस्त फेरफार संबंधात योग्य ती बाजू मांडून दाद मागणे योग्य होईल. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७३८-७४०/२८.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९३/२०११.**

श्री. केशव बळीराम तिडके,
मार्फत - श्रीमती सीमा मंगेश तडस,
प्लॉट नं. ८०, खरबी रोड, भाग्यश्री नगर,
नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
भंडारा.

श्री. अनील दलाल,
जनमाहिती अधिकारी तथा,
अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. आर. एम. भवसागर, वरिष्ठ लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ४.११.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन त्यांनी जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे दिनांक २३.८.२०१० चा अर्ज दिला होता. म्हणून त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती

त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील निवासी उपजिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे दाखल केली. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ४.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ६.११.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या अर्जात त्यांनी जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे दाखल केलेले दिनांक २३.८.२०१० चा अर्ज तहसीलदार, साकोली यांचेकडे पाठविण्याबाबत माहितीच्या अर्जात माहिती मागितली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २५.८.२०१० रोजी अपीलकर्त्यास दिनांक २३.८.२०१० चा अर्ज योग्य त्या कार्यवाहीसाठी तहसीलदार, साकोली यांच्याकडे पाठविण्यात आलेला होता. म्हणून त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ९.११.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगासमोर मान्य केले. परंतु याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, जिल्हाधिकारी, भंडारा यांचे कार्यालयाकडून तहसीलदार, साकोली यांचेकडे पाठविण्यात आलेल्या अर्जाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना पाहिजे आहे असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील निवासी उपजिल्हाधिकारी, भंडारा यांच्याकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. तथापी अपीलकर्ता प्रथम अपीलाचे सुनावणीस गैरहजर राहिले. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.१.२०११ रोजी देऊन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती पुरविलेली असल्यामुळे प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे असे आयोगासमोर वरिष्ठ लिपिक यांनी सांगितले.

५.  अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक ४.११.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ९.११.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र अपीलकर्त्याच्या दिनांक २३.८.२०१० च्या अर्जावर तहसीलदार, साकोली यांनी काय कार्यवाही केली आहे याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य व न्यायोचित होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक २३.८.२०१० च्या अर्जावर तहसीलदार, साकोली यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती प्राप्त करुन व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७४१-७४३/२९.७.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९०/२०११.**

श्री. घनश्याम अंतुजी चव्हाण,
शिवराबाईचे चाळीजवळ,
भानखेडा, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नगर भुमापन अधिकारी क्रमांक २,
नागपूर.

श्री. भेंडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
नगर भुमापन अधिकारी क्रमांक २,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.७.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ४.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी क्रमांक २ यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन अपील क्रमांक १५४/२००१-२००२ मौजा भानखेडा आदेश दिनांक ३१.५.२००२ अन्वये केलेल्या कार्यवाही संबंधाने एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना त्यांचे अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ५.३.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३.  जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी क्रमांक २, नागपूर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या दिनांक ४.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक १.२.२०११ च्या पत्राने माहिती अर्जातील ४ मुद्यांची माहिती मुद्येनिहाय उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्याना अद्यापही अपीलाचे आदेशाप्रमाणे आखीव पत्रिकेची प्रत प्राप्त झालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याच्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दिनांक १.२.२०११ रोजी एकूण ४ मुद्यांची माहिती कळविली असता त्यावेळी अपीलकर्त्याने सादर केलेल्या दुरुस्ती खरेदी खतानुसार त्यांचे कार्यालयाकडून नामांतरणाची कार्यवाही सुरु करण्यात आलेली होती. म्हणून त्यावेळेला कार्यवाही सुरु आहे असे अपीलकर्त्यास कळविले होते. मात्र आता सदर कार्यवाही पुर्ण झालेली असून अपीलकर्त्यास त्यांनी आयोगासमोर त्यांच्या मागणीनुसार आखीव पत्रिकेची प्रत उपलब्ध करुन दिली. सदरची प्रत अपीलकर्त्याने आयोगासमोर प्राप्त केली. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७४४-७४५/२९.७.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९५/२०११ व अपील क्रमांक ५९६/२०११.

श्री. शंकर चेटुमल गुलानी,
१०-के, जरिपटका, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. राजेश क-हाडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
आशीनगर झोन क्रमांक ९,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्रीमती माधुरी टेंभूर्णे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक अधिक्षक,
आशीनगर झोन क्रमांक ९,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.७.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये २ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. दोन्ही द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता व उत्तरवादी हे एकच असल्यामुळे दोन्ही अपीलाची सुनावणी एकत्रित घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक ५९५/२०११ याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक, आशीनगर, झोन क्रमांक ९, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन वार्ड नं. ५७, घर क्रमांक १७२९/ए/१६४ श्रीमती वासंती अवतराम पंजवानी यांचे नावावरती आहे. त्यांना या घराचे सन १९६० ते २०१० पर्यंत नगरपालिकाकडे

... २

भरलेला घर टॅक्सच्या पावतीची झेरॉक्स त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना दिनांक १४.१.२०११ च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी असे कळविले की, घर क्रमांक १७२९/ए/१६४, वार्ड क्रमांक ५७, बॅंक कॉलनी, जरीपटका, नागपूर या घराच्या नस्तीचा शोध घेणे सुरु आहे. नस्ती उपलब्ध झाल्यास आपणांस माहिती देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. मात्र ३० दिवसांत त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक आयुक्त, आशीनगर, झोन क्रमांक ९, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दिनांक २५.१.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा असा निर्णय दिला की, सदरच्या घराची नस्ती उपलब्ध होत नसल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करावी. मात्र प्रथम अपीलाचे निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. परंतु अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची नस्ती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही व तसे अपीलकर्त्यास दिनांक १४.१.२०११ च्या पत्राने कळविण्यात आले आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहाय्यक आयुक्त यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला व त्यामध्ये असे नमुद केले की, सदरची नस्ती ज्या कर्मचाऱ्यांजवळ होती ती सापडत नसल्यामुळे त्याबाबत त्यांचेवर विभागीय चौकशी प्रस्तावित करावी असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आला. त्याप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून ती कार्यवाही सुरु आहे असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या नस्तीचा शोध घेऊनही सापडत नसल्यामुळे अपीलकर्त्यास कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तथापी सदरची नस्ती ज्या कर्मचाऱ्यांकडे होती त्यांच्यावर जबाबदारी निश्‍चित करण्यासाठी त्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित केल्याचे दिसून येते. म्हणून प्रस्तुत प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यां विरुध्द ६० दिवसांचे मुदतीत विभागीय चौकशी सुरु करण्याचे संदर्भात निर्णय घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

५. अपील क्रमांक ५९६/२०११ याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ४.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक (कर निर्धारक), आशीनगर, झोन क्रमांक ९, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन वार्ड नं. ५७, घर क्रमांक १७२९/ए/५९ श्री. राजकुमार करमचंद केवलरामानी यांचे नावावरती हे घर आहे. त्यांच्या घराचे कर निर्धारणाबाबत अपीलकर्त्याने माहिती मागितलेली आहे. तथापी त्यांना दिनांक ३१.१.२०११ च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी असे कळविले की, घर क्रमांक १७२९/ए/५९, वार्ड क्रमांक ५७, बँक कॉलनी, जरीपटका, नागपूर या घराच्या नस्तीचा शोध घेणे सुरु आहे. नस्ती उपलब्ध झाल्यास आपणांस माहिती देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. मात्र ३० दिवसांत त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक आयुक्त, आशीनगर, झोन क्रमांक ९, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दिनांक १७.२.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा असा निर्णय दिला की, सदरच्या घराची नस्ती उपलब्ध होत नसल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करावी. मात्र प्रथम अपीलाचे निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

६. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ४.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. परंतु अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची नस्ती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही व तसे अपीलकर्त्यास दिनांक ३१.१.२०११ च्या पत्राने कळविण्यात आले आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहाय्यक आयुक्त यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला व त्यामध्ये असे नमुद केले की, सदरची नस्ती ज्या कर्मचाऱ्यांजवळ होती ती सापडत नसल्यामुळे त्याबाबत त्यांचेवर विभागीय चौकशी प्रस्तावित करावी असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आला. त्याप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून ती कार्यवाही सुरु आहे असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

... ४

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या नस्तीचा शोध घेऊनही सापडत नसल्यामुळे अपीलकर्त्यास कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तथापी सदरची नस्ती ज्या कर्मचाऱ्यांकडे होती त्यांच्या वरती जबाबदारी निश्चित करण्यासाठी त्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित केल्याचे दिसून येते. म्हणून प्रस्तुत प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यां विरुध्द ६० दिवसांचे मुदतीत विभागीय चौकशी सुरु करण्याचे संदर्भात निर्णय घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ५९५/२०११ व अपील क्रमांक ५९६/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत आहेत.

२) प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे निर्णयात नमुद केल्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांच्या ताब्यात सदरची नस्ती होती त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे. म्हणून संबंधिता विरुध्द ६० दिवसांचे मुदतीत विभागीय चौकशी सुरु करण्याबाबतचा निर्णय घेण्यात यावा व विभागीय चौकशीच्या आदेशाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७४६-७४९/३०.७.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९८/२०११.

श्री. विनायक रघुनाथजी कांबळे,
रुपाली अपार्टमेंट, लक्ष्मीनगर, वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक - १,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. एस. एम. कांडलकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक -१,
नागपूर विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.७.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.७.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. श्रीकांत पाडवार, विधी अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ११.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक - १, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन नोंदणी क्रमांक एसयु ३११९ विनायक रघुनाथजी कांबळे जात वैधता प्रमाणपत्र मिळणे संबंधी

... २

मा. उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडून सदर प्रस्ताव पाठविण्यात आला त्या प्रस्तावाची प्रत, केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. सदरचा प्रस्ताव हा दिनांक ११.७.२००७ रोजी पाठविण्यात आला होता. तथापी सदरचे प्रकरण जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात दिसून येत नाही. म्हणून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांना कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांचेकडे दिनांक १.१.२०११ रोजी दाखल केला. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही. तसेच अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणी प्रस्तावाचे अनुषंगाने कोणतीही कार्यवाही झाली नसल्यामुळे त्यांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही. त्यामुळे त्यांचे स्वतःचे नुकसान झाले असे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ११.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या प्रकरणाचा शोध त्यांचे कार्यालयात घेण्यात आला. सदरचे प्रकरण सन २००७ या वर्षातील आहे. तथापी सदरचे प्रकरण आढळून आले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती देता आली नाही व त्याबाबत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.१२.२०१० रोजी व दिनांक १३.७.२०११ रोजी कळविले असल्याचे नमुद केले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे दिनांक १.१.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेतली त्यावेळी अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे अपील खारीज करण्यात आल्याचे आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा जाती वैधता प्रमाणपत्र पडताळणीचा प्रस्ताव मा. उपसंचालक, भूमी अभिलेख यांचे कार्यालयाकडून दिनांक ११.७.२००७ च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे पाठविले होता. म्हणून सदरच्या प्रस्तावाचा पुन्हा कसून शोध घेणे आवश्यक आहे. कारण सदरचा प्रस्ताव हा सन २००७ या कालावधीचा असल्यामुळे त्याचा शोध घेणे आवश्यक दिसून येते. म्हणून जनमाहिती

अधिकारी यांनी सदरच्या प्रस्तावाचा त्यांच्या स्तरावर कसुन शोध घेण्याची कार्यवाही करुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या प्रस्तावाचा त्यांचे कार्यालयात कसून शोध घ्यावा व माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापी प्रस्ताव न मिळाल्यास संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७५०-७५२/३०.७.२०११